९५८७
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १३८८

प्रज्ञा प्रकाशन ५ वें

# आंबेडकरी साहित्य संप्रदायाचे समालोचन

भाग पहिला

—:लेखक:—

आप्पा रणपिसे ( महिमानगडकर )
अध्यक्ष महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषद

...वंतराव चव्हाण मुख्यमंत्री
...ट्र राज्य यांची प्रस्तावना

REFBK-0011530

...मावृत्ती ( १९६१ )

किंमत १ रुपया

प्रज्ञा प्रकाशन ५ वें

११५३०

# आंबेडकरी साहित्य संप्रदायाचे समालोचन

भाग पहिला

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ३१२१६ वि: निबंध
क्रमांक ९३७७ नों. दि.
REFBK-0011530

आप्पा रणपिसे ( महिमानगडकर )
अध्यक्ष महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषद

नामदार यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य यांची प्रस्तावना

प्रथमावृत्ती ( १९६१ )

किंमत १ रुपया

प्रकाशक—जनार्दन वाघमारे
महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषद
प्रज्ञा प्रकाशन ६०।३५ बी. डी. डी.
चाळ, वरळी मुंबई १८.

सर्व हक्क
सौ. सुभद्राबाई आ. रणपिसे
यांचे स्वाधीन

आवृत्ती पहिली १९६१
प्रति १०००

मुद्रक—सु. शं. दीक्षित
म. प्रि. ए.
सोमवार पेठ, पुणें.

# अनुक्रमणिका

निवेदन

( १ ) बौद्ध धर्म आणि आंबेडकरी साहित्य संप्रदाय

( २ ) डॉ. आंबेडकरांचें साहित्या-बाबत त्रोटक विचार

( ३ ) भिम युगाचे साहित्य समालोचन

( ४ ) बहुजन साहित्यांतील आंबेडकरी संप्रदाय

( ५ ) स्वजनोद्धारास्तव बौद्धिक संघर्ष

मुख्य मंत्री, महाराष्ट्र राज्य,
सचिवालय, मुंबई–३२.
दि. २८ फेब्रुवारी १९६१.

# संदेश

भारतीय राज्यघटना तयार करण्यांत ज्यांनी प्रमुख कामगिरी बजाविली त्या थोर व्यक्तिमध्यें डॉ. बाबासाहेब आपल्या देशांत अग्रगण्य होत. त्याचप्रमाणें दलित समाजाच्या विमोचनासाठीं जे प्रयत्न झालें त्यांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचें कार्य विशेषच उल्लेखनीय असे आहे. हरिजनांवर होणाऱ्या सामाजिक विषमतेविरूद्ध डॉ. आंबेडकर यांनी आपल्या संबंध आयुष्यभर प्राणपणाने प्रखर लढा दिला. हरिजनांना समाजांत सन्मानाचें स्थान मिळावें, समानतेची वागणूक मिळावी म्हणून डॉ. आंबेडकर हे कायावाचामनानें अक्षरशः झिजले. त्यांचे सर्व जीवन म्हणजे सामाजिक विषमतेविरुद्ध देण्यांत आलेला एक प्रखर लढा होता. सामाजिक समता हें त्यांचे आवडते ध्येय होते. व त्या ध्येयाच्या सिद्धिसाठीं त्यांनी हिंदुधर्माचाहि त्याग करून बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि एक प्रकारें हिंदु समाजांतील सनातनी प्रवृत्तीबद्दल निषेधच व्यक्त केला.

डॉ. आंबेडकर साऱ्या दलित समाजाचे वाचस्पति होते. दलितांवर होणाऱ्या अन्यायांना त्यांनी वाचा फोडली व त्यांच्यात स्वतःच्या हक्काबद्दल जागृति निर्माण केली, एवढेच नव्हे तर त्यांनी ह्या समाजाला संघटित केले. तेव्हां डॉ. आंबेडकरांच्या महनीय कार्याचें व असीम कर्तुत्वाचें यथायोग्य मूल्यमापन होण्याची अवश्यकता आहे. महाराष्ट्र दलित साहित्य संघाचे संमेलन लवकरच पुणें येथें भरणार आहे. त्याप्रसंगी "**आंबेडकरी साहित्य संप्रदायाचें समालोचन**" या नांवानें एक पुस्तक प्रकाशित करण्याचें ठरविलें आहें या पुस्तकांत महाराष्ट्रांतील दलित आणि बौद्ध समाजांत उपलब्ध असलेल्या सर्व प्रकारच्या साहित्याचें व दलितांसाठीं झालेल्या चळवळीचे यथार्थ दर्शन घडेल अशी अपेक्षा आहे. आधुनिक कालांतील एक निष्ठावंत समाज सेवक, विद्या व्यासंगी, कायदेपंडित आणि भारतीय घटनाकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी जी कामगिरी केली त्याचे समालोचन या ग्रंथांत येईल, अशी मी आशा व्यक्त करतो.

— **यशवंतरावजी चव्हाण**

# समर्पण

आबा



प. पू. बापू उर्फ श्रीरंग रामजी रणपिसे

आई



प. पू. लक्ष्मीबाई

बाळपणीच माझ्या करांगुलीस धरून शाळेबरोबरच मला या क्षेत्रांत सोडून दिवंगत झालेले माझे वडील बापूराव ऊर्फ श्रीरंग रामजी रणपिसे आणि जुन्या गोष्टी सांगण्यास आजही घरी तिष्ठत बसलेली माझी आई लक्ष्मीबाई या प. पू. मातृपितृ चरणीं ही दुसरी कलाकृति सादर समर्पण.

आप्पा रणपिसे

# निवेदन

पुणें येथें होणाऱ्या महाराष्ट्र दलित साहित्य संघाच्या ३ ऱ्या सम्मेलनाचे कार्य व याच-प्रसंगीं प्रकाशित करण्यासाठीं या पुस्तकाचे कार्य घाईनें उरकावें लागलें. त्यामुळें सदर पुस्तकांत बरेंच दोष व उणीवा राहून गेल्या आहेत. याबद्दल प्रथम मी वाचकांची क्षमा मागतो.

हा विषय पदवीधर विद्वानांनीं हाताळला पाहिजे. एवढा मोठा आहे. परंतु तसा प्रयत्न कोणीच करत नाहीं. अलीकडील आमच्यांत शिकलेली तरुण पिढी मोठी आहे. परंतु ती विविध क्षेत्रांत पुढें न येतां उलट डॉ. आंबेडकरांच्या कृपेनें मिळालेल्या शिक्षणाची प्रतिष्ठा, नोकरी, छोकरी व ओसरी यासाठीच पणाला लावतात. ही सखेदाश्चर्याची गोष्ट आहे. "कुछ उद्यम किजे आप खाये और औरन को दिजे" हें बाबांचे उद्‌गार ही पिढी सार्थ करील तो सुदिन !

गेलीं बारा वर्षें साहित्य संघाच्या कामासंबंधानें महाराष्ट्रांतील साहित्यसंबंधींत व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून जी माहिती मिळाली त्या आधारें मला हा विषय हाताळता आला. संघ कार्याच्या इतिवृत्ताद्वारें आजपर्यंत जाहीर जागृति करूनहि कांहींनीं दखल घेतली नाहीं. त्यामुळें कांहीं लोक त्यांची कला आणि साहित्य अज्ञात राहील त्यामुळें बहुतेकांचा यांत उल्लेख नसणार याबद्दल दिलगीर आहे. हें क्षेत्रच मुळीं शिकलेल्या जाणकारांचे परंतु त्यांचेंतूनच मला जो अनुभव आला. या कार्याला जी वागणूक मिळाली तिचे निवेदन—ठाकरे कृत शनिमहात्म्यासारखं प्रस्फोटक व पैसाफंडकार अं. दा. काळेच्या कैफतीसारखं करुण असें दिसेल. तेव्हां अशी पाळी येऊं नये म्हणून माझी मराठी दलित आणि बौद्ध साहित्यिक कला-वंतांना नम्र विनंति आहे कीं, अजूनहि दक्षपूर्ण लक्ष घाला. बौद्ध माइलेजबरोबर समृद्ध करा व आपल्या गुण-कलांची अभिवृद्धि होण्यासाठीं समग्र संशोधन पूर्ण अधिकारी पदवीधरांतर्फें या विषयांतील एकेका विभागाचे संदर्भ ग्रंथ, चरित्रें, समालोचन, समीक्षणें संकलन, परीक्षणें टीका, टिपा असें प्रभावी दर्जाचे ग्रंथ बाहेर काढू या कीं, जे प्राज्ञ—विशारद व आर्टस् कॉलेजच्या विषयांतसुद्धां आंतर्भूत होऊं शकतील.

यानंतरच्या सूचना कल्पना मिळाल्यास, चालना मिळाल्यास पुढील आवृत्ति मात्र समाधान-पूर्ण करण्याची खटपट जरूर करीन. या नंतरच्या दुसऱ्या भागांत (१) आमची वृत्तपत्रें (२) आमचे वक्ते (३) आमची ग्रंथालयें (४) प्रकाशन संस्था (५) शिल्पचित्र या विषयाचा अंतर्भाव आहे. तसेच ३ ऱ्या भागांत दलित साहित्य चळवळ अर्थात सविनय कैफियत सादर करणार आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनीं या पुस्तकास संदेश पाठवून मला उपकृत करून उत्तेजन व आशीर्वाद दिला त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

मोहन बिल्डिंग रु. न. ३
मानखुर्द मुंबई नं. ७३

**लेखक**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 3९२८८ दि. १९७५
क्रमांक १३०७ नों. दि. २०/५/७५
११५३०

# बुद्ध धम्म आणि आंबेडकरी साहित्य संप्रदाय

भारतीय धर्म संस्कृतीमध्यें धर्म अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थानें माणूस पुरुष म्हणून ठरतो. तर डॉ. आंबेडकरी संप्रदायांत धर्मदीक्षेच्या कितीतरी अगोदरपासून प्रज्ञा, करुणा, शील आणि मैत्री यानें माणूस मानव होतो. हें सार्थ सिद्ध झालेले आहे. कारण प्रज्ञा ही बाब मुळी विद्येवर अवलंबून आहे. व माणसाला अन्न या प्रथमावश्यक बाबीपेक्षां विद्या, ज्ञान या बाबींची अत्यंतिक जरूरीची आवश्यकता आहे. म्हणून बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "विद्या ही एक तलवार आहे. या तलवारीनें कोण कोणाची मान कापतो. तर शीलवान मनुष्य या तलवारीनें कुणाचें रक्षण करतो. त्यासाठीं धर्मशील बनलें पाहिजे. आज भारतांतील सर्व दलित व अस्पृश्य वर्ग डॉ. आंबेडकरांना आराध्य दैवत मानतात याचे कारणच हें कीं, माणसाला खऱ्या-खुऱ्या माणसाची ओळख करून त्यानीं अनकोविध अवतार क्रांत्या व युगपरिवर्तनांना न झेपणारी ऊलाढाल नव्हे महान क्रांतीच काय तर जगांत तसें पर्व प्रत्यक्ष निर्माण केले आणि त्यावर स्वतःच्या संप्रदायाची पोषक, प्रेरक, तारक, पुरक, तेजपुंज किरणे सांप्रत प्रकाशित ठेवून तें सहस्त्ररश्मी दिवाकरासारखें अखंड तळपत राहिले आहेत. अशा या प्रचंड पुरुषाचें आधी दैवते तथा त्यांचे आदर्श तिन होते. म. फुले, कबीर व भगवान गौतमबुद्ध आणि हे मानल तर हेच आदर्श कां ? व कशाकरितां अशा प्रश्नांची विचारसरणी भगवानबुद्धापर्यंत भिडविल्यानंतर भगवानबुद्धांनी कोणाचा आदर्श मानला तर तिथ मात्र बृत्ती स्तब्ध होते. याचे कारण काय तर बुद्धापासून नवबुद्धापर्यंतचे अडीच हजार वर्षातील स्थित्यंतर विचारांत घेऊन हिंद देश व संस्कृति कडे पाहिले तर जे चित्र दिसेल ते दोन्ही बाजूनी मुद्रांकित असणाऱ्या धावत्या नाण्यासारखें दिसेल या नाण्याची एक बाजू ब्राम्हणी शिकवणीनुसार चालत आलेली असून दुसरी बाजू या शिकवणीला शह किंवा चढाई तर कधीं प्रतिकार अथवा विरोध करीत आलेली आहे आणि या दोन्ही बाजूंचा समांतरप्रवाह काळ काम वेगानें आज जिथं स्थिर झाला. तिथं मात्र हें जिर्ण नाणं फिक पडूव दुसऱ्या मौल्यवान नव्या मुद्रांची धारणा करून गतिमान झालें आहे.

ऐतिहासिक मागोवा घेतल्यास धार्मिक क्रांत्या, राजे महाराजे, बादशहा वगैरेंचे वंश-परंपरागत अस्तित्वांच्या शासन सत्तेस्तव चढाया, लढाया, साधूसंतांचें व पंत पंडितजींच्या परंपरागत नैसर्गिक प्रपातउत्पात, क्षोभ, दुष्काळ वगैरे उलाढालीतूनहि मानवावश्यक शाश्वत काय शिल्लक

राहिलं तर तें एकच कीं, " ज्या शिकवणीनें जें हरववलं तें आज नव्या जाणीवेनें सांपडलें आणि तें प्रत्यहीं उजळ होत चालले याचें कारण हेंच कीं जो भारत देश संस्कृतीसंपन्न वैभवाच्या कळसानें तळपत होता. त्या वैभवाचा बुद्धकालीन काळ परदेशी प्रवाशांनी चांगलाच वाखाणलेला आहे व त्या काळांतील एक वर्ग जो कट्टर बुद्धानुयायी होता. तोच आज शुद्र अस्पृश्य म्हणून हीन दीन अशा मुकस्थितींत दाही दिशांत विखुरलेला आहे. यावरून या नवबुद्धांना खऱ्या बुद्धाची जाणीव होण्याची प्रक्रिया कुठल्या जादूनं केली तर तीं चिरंतन विद्येच्या तपश्चर्येने मिळविलेल्या प्रगाढ प्रज्ञेनेंच होय ! या प्रज्ञेलाच काही प्रातिभाच म्हणतात. प्रातिभा म्हणजे दिव्यदृष्टि. हिलाच राजारामशास्त्री भागवत जगाचे नेत्र म्हणतात. तर डॉ. बाबासाहेब म्हणतात, " मानमी जीवनांतील वैचारिक आणि नैतिक मूल्यें कधीच स्थिर राहिली नाहीत. ती कालामानाप्रमाणें प्रत्यही बदलत राहतात. नुसती बदलतात नव्हे, तर ती प्रगट होत जातात. भारतीय विद्यार्थ्यांनीं या नव्या नव्या निर्माण होणाऱ्या जिवनमूल्यांची दखल घेतली पाहिजे आणि आपणही तीं आचरणांत आणण्यास सिद्ध झाले पाहिजे. खेदाची गोष्ट ही कीं आधुनिक विद्यार्थ्यांची बौद्धिक आणि वैचारींक पातळी रोडावत चालली आहे. भुतकाळांतील मानवी प्रज्ञेशीं आजच्या प्रज्ञेचीं तुलनाच होऊ शकत नाहीं. व या परागतीचे कारण अगदी स्पष्ट आहे. आजचा विद्यार्थी वर्ग भूतकालीन प्रज्ञावंत आणि प्रतिभावंत याच्या तत्वज्ञान वाङ्मय प्रकृतींचा अभ्यास मन लावून करीत नाहींत, यावरून या भव्यदिव्य दृष्टीनें प्रज्ञांकित प्राज्ञप्रभावी होण्यासाठीं या देशावरील तत्वज्ञान व वाङ्मय प्रकृति पहाण्याचा आदेश बाबासाहेबांनी दिला. तो यथार्थ होय. आवश्यक होय.

हें सर्व पहाण्याच्या ज्या पायऱ्या आहेत. त्यापैकी धर्म, तत्वज्ञान, संस्कृति, साहित्य व इतिहास या होत, यांचा थोडक्यांत परिचय पहातांना धर्म यासंबंधी अनेक मतें आहेत.

पितुंनु स्तोषे महो धर्माणं तविषिम्

म्हणजे महीवरचें जें अन्न खातो. धारण करतो. म्हणजे ज्यामुळें समाजाचें व समाजामुळें जगाचें धारण झाले त्याला धर्म म्हणतात. तर धर्म म्हणजे शाश्वत आचार टिळक, सावरकर असिंधू सिंधू प्रयतांस हिंदू धर्म संस्कृति ठरवतात. शि. म. परांजपे म्हणतात, धर्म हा मूळ देवानें अशक्त बाया, पोरें व भट भिक्षुक यांच्या करमणुकीकरितां केला आहे. तर डॉ. आंबेडकर म्हणतात, व्यक्तींची व्यक्तीशी जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सद्वर्तणूक म्हणजे धर्म किंवा जो धर्म माणसाला कल्याण साधायला कारणीभूत होईल. तोच धर्म ! याप्रमाणेंच ज्या ज्ञानानें शाश्वत बाव सिद्ध केली तें थोरामोठ्यांचे धर्म संस्कृति अनुसार जे ठाम मत ठरलेलें त्याचें तत्वज्ञान म्हणून पुढें आलेले असते आणि अशा आधारे चालत आलेलें रूढ झालेली जी समाज प्रवृत्ति

राहिलं तर तें एकच कीं, " ज्या शिकवणीनें जें हरवलं तें आज नव्या जाणीवेनें सांपडलें आणि तें प्रत्यहीं उजळ होत चालले याचें कारण हेंच कीं जो भारत देश संस्कृतीसंपन्न वैभवाच्या कळसानें तळपत होता. त्या वैभवाचा बुद्धकालीन काळ परदेशी प्रवाशांनी चांगलाच वाखाणलेला आहे व त्या काळांतील एक वर्ग जो कट्टर बुद्धानुयायी होता. तोच आज शुद्र अस्पृश्य म्हणून हीनदीन अशा मुकस्थितींत दाही दिशांत विखुरलेला आहे. यावरून या नवबुद्धांना खऱ्या बुद्धाची जाणीव होण्याची प्रक्रिया कुठल्या जादूनं केली तर तीं चिरंतन विद्येच्या तपश्चर्येने मिळविलेल्या प्रगाढ प्रज्ञेनेंच होय ! या प्रज्ञेलाच काही प्रतिभाच म्हणतात. प्रतिभा म्हणजे दिव्यदृष्टि. हिलाच राजारामशास्त्री भागवत जगाचे नेत्र म्हणतात. तर डॉ. बाबासाहेब म्हणतात, " मानवी जीवनांतील वैचारिक आणि नैतिक मूल्यें कधीच स्थिर राहिली नाहीत. ती कालामानाप्रमाणें प्रत्यही बदलत राहतात. नुसती बदलतात नव्हे, तर ती प्रगट होत जातात. भारतीय विद्यार्थ्यांनीं या नव्या नव्या निर्माण होणाऱ्या जिवनमूल्यांची दखल घेतली पाहिजे आणि आपणही तीं आचरणांत आणण्यास सिद्ध झाले पाहिजे. खेदाची गोष्ट ही कीं आधुनिक विद्यार्थ्यांची बौद्धिक आणि वैचारीक पातळी रोडावत चालली आहे. भुतकाळांतील मानवी प्रज्ञेशीं आजच्या प्रज्ञेचीं तुलनाच होऊ शकत नाहीं. व या परागतीचे कारण अगदी स्पष्ट आहे. आजचा विद्यार्थी वर्ग भूतकालीन प्रज्ञावंत आणि प्रतिभावंत याच्या तत्वज्ञान वाङ्मय प्रकृतींचा अभ्यास मन लावून करीत नाहींत, यावरून या भव्यदिव्य दृष्टीनें प्रज्ञांकित प्राज्ञप्रभावी होण्यासाठीं या देशावरील तत्वज्ञान व वाङ्मय प्रकृति पहाण्याचा आदेश बाबासाहेबांनी दिला. तो यथार्थ होय. आवश्यक होय.

हें सर्व पहाण्याच्या ज्या पायऱ्या आहेत. त्यापैकी धर्म, तत्वज्ञान, संस्कृति, साहित्य व इतिहास या होत, यांचा थोडक्यांत परिचय पहातांना धर्म यासंबंधी अनेक मतें आहेत.

पितुंनु स्तोषे महो धर्माणं तविषिम्

म्हणजे महीवरचें जें अन्न खातो. धारण करतो. म्हणजे ज्यामुळें समाजाचें व समाजामुळें जगाचें धारण झाले त्याला धर्म म्हणतात. तर धर्म म्हणजे शाश्वत आचार टिळक, सावरकर असिंधू सिंधू प्रयतांस हिंदू धर्म संस्कृति ठरवतात. शि. म. परांजपे म्हणतात, धर्म हा मूळ देवानें अशक्त बाया, पोरें व भट भिक्षुक यांच्या करमणुकीकरितां केला आहे. तर डॉ. आंबेडकर म्हणतात, व्यक्तींची व्यक्तीशी जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सद्वर्तणूक म्हणजे धर्म किंवा जो धर्म माणसाला कल्याण साधायला कारणीभूत होईल. तोच धर्म ! याप्रमाणेंच ज्या ज्ञानानें शाश्वत बाब सिद्ध केली तें थोरामोठ्यांचे धर्म संस्कृति अनुसार जे ठाम मत ठरलेलें त्याचें तत्वज्ञान म्हणून पुढें आलेले असते आणि अशा आधारे चालत आलेलें रूढ झालेली जी समाज प्रवृत्ति

संस्कृति होय. अशा तऱ्हेनें प्रत्येक सामाजिक घटना व घडामोडी किंवा विचारसरणी हीं ऐतिहासिक कार्यकारण भावानुरूपच उत्पन्न होत असतात. म्हणून इतिहास म्हणजे काय तर ईति पासून जें घडले—सुरुवातीपासून जें घडलें तें पुढच्या पिढीसाठीं प्रामाणिकपणें सांगितलें हें होय. शेवटी साहित्य म्हणजे काय हें पाहूं जाता. " सत्यं शिवं सुंदरं " ही हिंदूप्रणीत व्याख्या आदर्श मानली आहे. साहित्य हा मानवाचा बौद्धिक शृंगार आहे. समाजाची विचारसरणी साहित्य व वाङ्मयद्वारा प्रगट होते. म्हणून डॉ. जान्सन म्हणतात, ज्ञानाचें लेखन किंवा काव्य जें मानवी निर्मितीपासून त्याच्यासहित आलेलं तें साहित्य तर वेस्टरच्या जगप्रसिद्ध शब्दकोशांत विद्याभ्यास, व्याकरण, लेखन, ज्ञानपरिचय हा शब्दार्थ आहे. साहित्याला आम्ही जीवनाचा शिक्षक व जनतेचा गुरू मानतो; असें रशियन विद्वान म्हणतात. डॉ. बाबासाहेब लिटरेचरचा साहित्य हा शब्द चूक मानतात. यावरून साहित्यामध्यें काव्य, नाट्य, संगीत, चित्र, मूर्ती, शिल्प या सहा कला ललित कला आहेत.

जगांतील घडामोडीचे देखावे अशाश्वत असल्यामुळें त्यापासून मिळणारें ज्ञानसुख व उपदेश नेहमीं मिळावें म्हणून ध्वनि, रंग, पाषाण इत्यादि साधनांच्या योगाने वरील अशाश्वत घडामोडींना शाश्वत टिकविण्यासाठीं जे प्रयत्न अगर योजना मानव योजितो त्या योजना या प्रयत्नांना ललित कला असें म्हणतात.

वरील सहा पायऱ्याचे साधन भाषा, आदिमानवाची भाषा, संकेत, नंतर माणसानें आपल्या मनांतील विचार दुसऱ्यांस कळविण्याचें जें साधन शब्दरूपानें केले तीच भाषा होय. अशा अन्य अनेक भाषा होऊन त्या प्रांतीयतेवर नव्हे तर बारा कोसावर बदलतात. यांवर प्रमाण बसलं आहे; व अशा प्रत्येक भाषेचे व्याकरण ठरून कालप्रवाहाने वरील सहा गोष्टी रूढपणें विकसित होत असतात. या सहा पायऱ्यांच्या सोपानावर सद्धर्म संपन्न सुसंस्कृती विराजते. म्हणून साहित्याला कोणत्याहि राष्ट्रांच्या समाजांच्या जीवनांत स्थान आहे. ज्या राष्ट्राला समाजाला स्वतःचें साहित्य नाहीं, त्याला स्वतःचें सामर्थ्य कमीच असल्याचें अनुभवास येईल. राष्ट्र, देश, समाज याच्या सामर्थ्याचे साहित्य हें प्रभावी साधन आहे.

साहित्याला जीवनाचे प्रतिबिंब मानतात. म्हणून जीवनाची उपाधी नसती तर गरजवाणी विचार व साहित्य हीं देखील निर्माण झालीं नसतीं. जीवनाचा आविष्कार शरीरानें व शरीराचा आविष्कार समाजरचनेने होत असतो; व समाज नेहमीं एका स्थितींतून दुसऱ्या स्थितीकडे जाण्याच्या प्रस्थान अवस्थेंत असतो; व या समाजाचा खरा साहित्यिक हा जीवनमरणा पलीकडचा असतो. कारण जें इतके दिवस हजारो पिढ्या आमच्यासह आलें तें आम्हीं गेल्यावर आमच्या वंशजाना सोडील काय ? तुम्ही आम्ही जाऊं. आमच्यानंतर येणारासह साहित्य

रहाणारच म्हणून तुम्ही कुणीहि असा तुमचे जीवन तुम्ही कलावंताचें बनविल्याशिवाय आपण जगूंच शकत नाहीं. जगणेंहि एक सर्वांत थोर कला आहे. बालपणांतील खेळ, तारुण्यांतील लग्न पोक्तवयांतील संसार, वृद्धावस्थेतील आयुष्य तुम्ही कलेच्या कलानं घेतलं नाहीं तर आयुष्य यशस्वी होणं कठीण. मुत्सद्याचें राजकारण व धंदेवाईकांचा धंदा कलात्मकतेन केल्याशिवाय चालत नाहीं ! म्हणून जिवनांत कला अमर आहे !

कलेसंबंधानें बौद्ध धर्म संस्कृतींत कांहीं निर्बंध आहेत. जेणेंकरून चित्तवृत्ति चंचल तथा गैरविकारी होतात. अशा विकारवश कलांना उत्तेजन देतां कामा नये. उलट चार आर्य सत्यावर अधिष्ठित कला व साहित्व असेल तें चिरंतन स्वरूपांत अनेक घडामोडींतून सलामतपणें आज अडीचहजार वर्षानेहि आढळुन आलं आहे.

ज्ञान ही प्रज्ञेची बैठक आहे. म्हणून बाबासाहेब म्हणतात ज्या धर्मांत ज्ञानप्राप्ति सर्वांना सुलभ आहे; तोच धर्म सद्धर्म होय ! तरी प्रत्येक व्यक्तीला प्रज्ञेची आवश्यकता आहे. प्रज्ञा हें शास्त्र आहे. तें कसें वापरावें हें शिल शिकवितें. शीलावांचून प्रज्ञा घातक असतें.

बुद्धाला जगांत नीतीचें साम्राज्य पसरावयाचें होते; व शील हा त्याचा पाया आहे. शेकडों विद्वान ऑफिसर देशांत विखुरले असून उपयोगी नाहीं. ते शीलवान् हवेत. नाहींतर ते आपल्या विद्वत्तेचा उपयोग लोकांना लुबाडण्याकरितां स्वत;ची तुंबडी भरण्यासाठीं करूं शकतात. एखाद्या डॉक्टरजवळ विद्वत्ता आहे; परंतु शिल नाहीं; तर तो आलेल्या रुग्णाकडून पैसे उकाळण्याचा प्रयत्न करील व जर पैसे मिळाले नाहींत, तर तो आपल्या ज्ञानाचा उपयोग त्या रोग्याकरितां करणार नाहीं.

प्रज्ञा व करुणा हे दोन्ही बुद्धधम्माचें स्तंभ आहेत. तुमची मैत्री विश्वासात्मक करा; व मनास एवढें व्यापक करा कीं द्वेषभावनेचा शिरकाव देखील त्यांत होता कामा नये ! म्हणून प्रज्ञा, करुणा शील आणि मैत्री यावर अधिष्ठित जें साहित्य, जीं कला आणि संस्कृति संपन्न, त्याची परंपरा उच्चतम् अशी प्रवाही राहील तर या देशाचे व लोकांच अभिनव परिवर्तन झाल्याचें अति उत्कृष्ट असं विलोभनीय दृश्य दिसेल यांत शंका नाहीं. हें खरं आहे. परंतु या परिवर्तनीय अपेक्षेच परावर्तन कसं काय झालं हें लक्षांत घेतल्यानंतर हें महत्वमापन ध्यानीं येईल.

प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शुद्र कोण होते ? या ग्रंथांत पृष्ठ २४६ वर म्हणतात. “ मनुस्मृति व इतर स्मृति यांनीं स्त्रिया व शुद्र यांना इस्टेट करण्याचा व वेद शिकण्याचा अधिकार कां दिलेला नाहीं. हें फार थोड्या लोकांना समजतें. हे निर्बंध पूर्वमीमांसेंतील

नियमाचे नैसर्गिक परिणाम आहेत. ही गोष्ट लक्षांत ठेवली तर या बाबतीतील गूढ आपोआप सुटतें. स्त्रिया व शुद्र केवळ त्या स्त्रिया व शूद्र आहेत, म्हणून त्यांना इस्टेट करतां येत नाहीं; व त्यांना यज्ञ करण्याचा अधिकार नाही. हेच दुसऱ्या शब्दांत सांमायचं झालं तर ज्याला यज्ञ करण्याचा अधिकार नाही त्याला इस्टेट करण्याचा अधिकार नाही. यज्ञ करण्याचा अधिकार उपनयनांवर अवलंबून आहे. याचा अर्थ असा की उपनयनाचा अधिकार आहे; फक्त अशानांच इस्टेट करण्याचा अधिकार आहे.

पूर्व मीमासेचा नियम असा आहे कीं यज्ञांत वैदिक मंत्र म्हटलें पाहिजेत. म्हणजेच यज्ञ करणारानें वेदाचा अभ्यास केलेला असला पाहिजे. ज्यानें वेदाचा अभ्यास केलेला नाही, तो यज्ञ करण्यास योग्य नाही. ज्याचा उपनयन विधि झालेला आहे, त्यांनाच वेदाचा अभ्यास करतां येतो. हेंच दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हटलें तर ज्ञानार्जन व विद्यार्जन म्हणजेच वेदाभ्यास उपनयनांवर अवलंबून आहे. ज्यांचें उपनयन झालेलें नसेल त्यांचा ज्ञानाकडील मार्ग बंद उपनयन हा दिसतो इतका साधा विधि नाही. इस्टेटीचा अधिकार व ज्ञानाचा अधिकार या उपनयनाच्या दोन अत्यंत महत्त्वाच्या पायऱ्या आहेत. उपनयन व शिक्षण यांचे नाते काय आहे यांची एकदा जाणीव झाली तर केवळ उपनयन नष्ट झाल्यामुळें शुद्राची अधोगति झाली हा सिद्धांत समजण्याच्या बाबतींत जी अडचण भासते ती दूर झालीच पाहिजे.

वर केलेल्या विवेचनावरून हें दिसून येईल कीं प्राचीन आर्य समाजांत उपनयन संस्काराला किती महत्व देण्यांत येत होते. आणि त्यांच्यावर माणसांचा सामाजिक दर्जा आणि माणसाचें वैयक्तिक हक्क कसे अवलंबून होते. ज्याला उपनयन नसेल त्या माणसाला सामाजिक अधोगतीच्या अज्ञानाच्या आणि दारिद्र्याच्या गर्तेत लोटण्यांत येत असे. उपनयन विधि करण्याचे बंद करणें हे भयंकर शस्त्र ब्राह्मणांनीं शूद्रांच्या विरुद्ध सूड उगविण्यासाठीं शोधून काढलें. ॲटमबॉंबप्रमाणें त्याचा परिणाम झाला. ब्राम्हणांच्याच शब्दांत सांगावयाचे तर त्या शस्त्रानें शूद्राची स्मशानभूमी केली. अशा तऱ्हेनें शूद्रांना उपनयन नाकारण्यामध्यें शूद्र आपल्या मूळच्या क्षत्रियपदापासून च्युत झाले. सामाजिक दृष्टीनें त्यांची अधोगति झाली. त्यामुळें त्यांचा दर्जा वैश्याच्या खालचा झाला. आणि याप्रमाणें त्यांचा स्वतंत्र चौथा वर्ग उत्पन्न करण्यांत आला. तेव्हां पृष्ठ नं. ५६ व सारांश नं. ५ मध्यें ······ शूद्रानें ज्ञान संपादन करूं नये. त्याला. शिक्षण देणें पाप आहे. तसेच तो गुन्हां होतो. असो. इ. स. पूर्वी पांच हजार वर्षापूर्वी मानवी टोळ्या भारतांत आल्या व दोन हजारांचे दरम्यान वेदाची उत्पत्ति झाली व त्या काळांतील वरील परिस्थिती लक्षांत घेता तीसंबंधानें महात्मा फुलें गुलामगिरी या ग्रंथांत पृष्ठ ११५ वर म्हणतात...............

" ब्राम्हण वेदकारांनीं अनेक स्मृति सहिताशास्त्रे व पुराणें वगैरे भारेच्या भारे नवीन ग्रंथ बनवून त्या सर्वांत शूद्रांवर ब्राह्मण लोकांचे वर्चस्व स्थापून त्यांनीं आपल्या वडिलोपार्जित शिपाईगिरीच्या मार्गांत काठी ठोकून राहणें हा मोठा धार्मिकपणा आहे; असा डौल घातला. हें सर्व ब्रह्मकपट पुढें कधीं शूद्रांच्या ध्यानांत येऊं नये; याकरितां अथवा त्या ग्रंथांत पाहिजे तसे फेरफार पुम्हां पुढें करतां यावेत म्हणून शूद्र वगैरे पाताळी लोकांस मुळीच कोणी ज्ञान देऊं नये असे फारच मजबूत लेख मनुसंहितेसारख्या अपवित्र ग्रंथांत करून ठेवलें आहेत.

म्हणूनच राजारामशास्त्री भागवतसुद्धां " जातीभेद भक्षा भक्ष्य: " इत्यादि खुळचट कल्पना ज्यांत रूढ झाल्या आहेत त्या धर्माला भटीधर्म किंवा नकली धर्म तथा संस्कृति म्हणत तर बाबाणाहेब बदनाम संस्कृति अथवा आग्रीकल्चर म्हणत. वरीलप्रमाणें सांगितलेल्या धर्म व संस्कृतीमुळें अब्राह्मण वर्गाचा तिसरा डोळा जगन्नेत्रच आंधळे झाले, जिज्ञासेचें विश्वच काळोखी झाले आणि केवळ दुरान्वयानें ऐकीव बाबीवर श्रद्धेची पुटें चढली व तीं एवढ्या शिगेला पोहचली कीं कुऱ्हाडीचें दांडें गोतास काळ या म्हणीच्या उत्पत्तीसमान नरेची केला हीन किती नर अशी परिस्थिती झाली व या विरुद्ध जो वागू लागला तो कांहींहि वीर संत, पंत, तंत, शाहीर, तमासगीर, कार्यकर्ता, पुढारी, लेखक, कवी वगैरेना रूढ समाजानें नियतीनें कठोरपणें निखाऱ्यांवर भाजलेच म्हणून समजा. तेव्हां उपनयन बाबीसंबंधीं बाबासाहेब जे म्हणतात त्यावेळेपासून बौद्ध काल व शंकराचार्यांपासून धर्मांतर घोषणेचा मुक्तीकोन पथेच काळ या दोन काळांतील तफावतीची स्वतंत्र, मुक्त, स्वच्छ, उच्च जाणीव व प्रेरणा व ध्येय जे अचूक दाखवले तें परंपरा व रूढ चाकोरीपेक्षां वेगळं, स्वतंत्र, निर्धोक, सुगम, गतिमान असं दाखवले. तेंच म्हणजे क्रांतीचे चक्र अर्धे फिरले. आंसासह चाक पूर्ण फिरल्याशिवाय खरी क्रांतीच होऊं शकत नाहीं. तें चाक आम्हीच फिरवूं. हें म्हणणाऱ्या बाबासाहेबांनीं चक्षुर्वैसत्यम् संबंध चाक फिरवलं, धर्मचक्र, परिवर्तन केलं !

पहिलं बंड बुद्धानें केले दुसरे बंड बाबांनीं केले. ते परिपूर्ण झाले. म्हणून ते द्रष्टेपणाने कोणतीहि गोष्ट सांगत. त्यापैकीं मी सारा भारत बौद्धमय करीन. बुद्धाची आलेली लाट पुन्हां कधींहि परत फिरणार नाहीं. तें याचवरून आत्मविश्वासाई नव्हें काय ! व हा आत्मविश्वास, हा द्रष्टेपणा काल वाऱ्याशीं दिशा ओळखणारी प्रज्ञा हें कसं काय कळूं शकते तर तेच भवितव्या-बद्दल म्हणतात. पांच टक्के प्रज्ञा व पंचावन टक्के प्रयत्न, महत्त्वाकांक्षा, आयुष्याची सर्वांगीण प्रगति करून घेण्याची तीव्र इच्छा या गोष्टींना भविष्यापेक्षां जास्त महत्त्व द्या ! हेंच चरथ भिक्खवे · · या बुद्ध वंदनानुसार निग्रहानें सांगतात. याचे प्रयोजय काय !

ज्यांची शक्ति अपुरी आहे. त्यांना जास्त शक्तिदान केले पाहिजे. असेहि ते म्हणतात- म्हणजे आधी म्हटल्याप्रमाणें मानवतेचे दोन बाजूचे कालगतीचें नाणें येथें स्थिर होऊन त्याची ओलीसुकी बाबासाहेबांचा आदेश, उपदेश, चारित्र्यानें परिपूर्ण बदलली. मूल्यें बळावली. कसे उजळ झाला. जगनेत्र किलकिल झालें व भीम रवीच्या किरणें केल्या काबीज दाहीदिशा असे विश्व उजळ झाले, मंगल झालें, पवित्र झालें.बाबासाहेब अट्टाहासानें आदेश देतात, संदेश देतात, झगडा झगडा आणखी झगडा निखाऱ्यांवर भाजून घेतल्याशिवाय तुमची उन्नति नाहीं ! एवढ्या पोट-तिढकीनें सांगतात. याचं कारण काय तर युगायुगाचीं पुटं चढून काळवंडलेला काळाकुट्ट भीषण क्रूर आपला इतिहास महत्प्रयासानें त्यांनीं पाहिला, जाणून घेतला, ते गत शल्य, दुःख आणि संस्कृति पुन्हां नको. म्हणून मागे पहात पहात भवितव्याच्या पल्ल्याची त्यांचीं नजर दूरच अंतरिक्ष भेदून सत्यशोधण्याएवढी त्याची दृष्टि झाली होती. त्यानुसारच राष्ट्रांत जे विचारी व कर्ते पुरुष निर्माण होतात, त्यांच्या विचारांचें व कर्तृत्वाचें धन ग्रंथबद्ध झाले कीं पुढील पिढीवर त्यांचे संस्कार होतात, व त्यां पिढींत जी कर्ती मांणसें निर्माण होतात, त्यांचे तत्वज्ञान पुन्हां ग्रंथबद्ध झाते ते पुढील पिढीस उपयोगी ठरतें. आणि अशा रीतीनें राष्ट्राचे ज्ञानधन वाढत जाऊन त्यांतून अनेक प्रकारची शास्त्रें निर्माण होऊन समाज बलशाली होतो व तो समाज त्यांचा आदर्श गातो. म्हणून अभिमानानें सांगितले जाते कीं, इंग्रज लोक एकवेळ आपला इंग्लंड देश गमावण्यास तयार होतील, परंतु शेक्सपियरची नाटकें ते प्रमाणापलीकडे जपतील.

ग्रंथकाराच्या व्यक्तित्वाचा आविष्कार म्हणजे केवळ ग्रंथ. अशा ग्रंथांचें मूल्य वरील कसोटींनें पाहिल्यास वा देशांतील संस्कृति किती उच्च दर्जाची आहे हे आज इंग्रजीला वाघिणीचे दूध म्हणून म्हणतात त्यावरून कळेलच.

इंग्लंडचा शेक्स्पिअर, रशियाचा टॉलस्टॉय, मॅक्झीम गोर्की, चीनचा लाशुन, जर्मनचा गटे, फ्रान्सचा लुथर, भारताचे टागोर अशा व्यक्तींच्या अभिमानानें त्या त्या राष्ट्रांची मान उंच आहे; व याच अभिमानानें ते ते समाज, वर्ग, धर्म, देश पण भारावलेले असतात. म्हणून बौध्द आणि दलितादि ,अस्पृश्यसुध्दां डॉ. बाबासाहेब आंबेडकर तत्त्वज्ञान आणि ग्रंथलेखन हाच ' आमचा बोधिवृक्ष ' मानतो; कारण जीं साहित्य संस्कृति ग्रंथबध्दपणें ज्ञानाच्या सदावर्तींतून, ग्रंथालयांतून जपून ठेवली जातें असें ग्रंथकार नष्ट झालेंत. इजिप्तमधील ख्रिस्ती मध्ययुगांत मुसलमानांनीं आलेक्झांड्रिया येथील एक लाख पुस्तकाचे ग्रंथालय जाळलें त्या वेळीं नाश करतांना खलिफा उमरला त्याचा सरदार म्हणाला, ' याचं चावीतच काफर नष्ट होणार.'—

त्याचप्रमाणें मुसलमानी नालंदा, तक्षशिला, वाराणशी येथील प्रचंड ग्रंथागार उध्वस्त केले- नेपाळांतील एका बौद्ध विहारांतील ग्रंथ राजमंत्री राणाजंग बहादूरनें रस्त्यावर फेकलें पण ते रेसिडेंट डॉ. राईट यानें जमवून केंब्रीज विद्यापीठास दिले. अशा तऱ्हेनें ग्रंथबद्ध तत्त्वज्ञान संस्कृति कालप्रवाहांत कधी कधी नष्ट होतेच. पण या बोधीवृक्षाची ज्ञानछाया आबालवृद्धांच्या दिलदतरांत एवढी चपखल बसली आहे की ती कोणतीच ताकद नष्ट करू शकस नाही. उलट उत्तरोत्तर ती नव्या फुलपुष्पभारानें फुलारत आहे. म्हणून हा बोधीवृक्ष व त्याच्या छायेमधील जो साहित्यकीय जे वाङ्मयीनुसार आहे, तो सम्प्रतकाळांत स्वतंत्र आहे, वैशिष्ठपूर्ण आहे म्हणून त्यांस आंबेडकरी साहित्य संप्रदाय असे म्हणणेच उचित होय !

* * *

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्याबाबत नोटक विचार

आज जगांत भगवान गौतमबुद्धाचें श्रेष्ठत्व सर्व धर्मांतील बुद्धिमान लोक मानतात. त्याचे कारण काय तर " सर्व असंतोषाचें मूळ तृष्णा व तिच्या शमनाचें प्रभावी साधन ज्ञान व तें सर्वांना प्राप्त झाले पाहिजे, हें सर्वांआधी भगवान गौतम बुध्दानें सांगितलें. ' तेव्हां ज्ञानाच्या ' क्षेत्राचें अधिपत्य आजपर्यंत ब्राम्हणाकडे होते. या ज्ञान क्षेत्राचीं अभिवृध्दि करणारी अविकृत संस्था म्हणून निरनिराळ्या देशी भाषेंत त्या त्या साहित्य संस्था आहेत. अशा संस्थेमधून संशोधन, संकलन, संपादन केले जाते; व ते जगाच्या चव्हाट्यावर आणले जाते. यावरून महाराष्ट्रीय मराठी साहित्य ज्यांनीं ज्ञात केलें व ते ज्ञान कितपत समर्पक आहे किंवा या ज्ञान संस्थेच्या साहित्यसंबंधानें ज्ञाननिधि विद्यावाचस्पति डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचीं काय मतें आहेत. याचा अभ्यास होणें जरूरीचें आहे. तेणें या प्रांतांत क्रांतिकारक प्रकाश पडणार आहे.

मराठी भाषेंतून मराठी पुरतांच विचार केला तर डॉ. आंबेडकरांचे किंचितसे मार्गदर्शन पण ते सहस्ररश्मी दिवाकरासारखें दैदिप्यमान असें अखंडपणें तळपणारें आहे. अस्पृश्य समाजाच्या सभा परिषदामध्ये तसेच इतरत्र होणारीं डॉ. आंबेडकरांचीं भाषणें शेकडोंनीं असून तीं अत्यंत माननीय आणि स्फूर्तिदायक आहेत. त्या भाषणांतून हिंदु धर्माच्या सर्व अंगाचे

मार्मिक आणि मर्मभेदी छाननी झालेली आहे. त्यांच्या भाषणांनी हजारों वर्षे लाथाडलेल्या धार्मिक व सामाजिक छळानें अमानुषपणें ठार मारलेला अस्पृश्य समाज खडबडून जागा झाला. याबद्दल दुमत नाहीं. त्यांच्या भाषणांमधील सडेतोडपणा, भिडेल असा युक्तीवाद आणि गुलामगिरींत नेभळ्या झालेल्या समाजाला उसळी मारण्यास उद्युक्त करणारा त्यांचा डोकेबाज आवेश यामुळें या समाजांत क्रांती झाली आहे.

वाच्यांर्थ तथा यच्चयावत वाचेनें जे बोलले जाते तें वाङ्मय. या दृष्टीनें आंबेडकरांचे हें वाङ्मय बहुमोल आहे. आचार्य अत्रे यांच्या भाषणांत हेच दिसते कीं, डॉ. आंबेडकर पुरोगामी व वास्तववादी वाङ्मयकार आहेत. त्यांनीं राजकीय विषयांवर लिहिलेलें लेख बऱ्याच मोठ्या वृत्तपत्रांतून उद्‌घृत केले आहेत. त्यांनीं महत्त्वाच्या प्रचलित विषयांवर वेळोवेळीं दिलेल्या मुलाखती टाईम्स, मँचेस्टर, गार्डीयन इत्यादितून प्रसिद्ध आहेत. त्यांचा कोणताहि लेख ध्या त्यामध्यें त्यांची गाढ विद्वता दिसून येईल. त्यांची विषयाची मांडणी अतिशय तर्कशुद्ध असते. त्यांचे मराठीं भाषेवर जेवढे प्रभुत्व आहे त्यापेक्षां अधिक इंग्रजी भाषेवर आहे. त्यांची इंग्रजी व्याख्यानें ऐकणें म्हणजे आपण एका निराळ्याच वातावरणांत आहोंत असे वाटते. गोलमेज परिषदेमधील भाषणें इतकी सडेतोड आहेत की ती वाचून डॉक्टरांच्याबद्दल आदर दुणावल्याशिवाय राहवत नाही. सायमन कमिशन वेळी ज्या प्रांतिक कमिटी नेमल्या होत्या त्या कमिटीपुढें डॉ. साहेबांनी सादर केलेल्या कैफियती अतिशय वाचयीय आहेत. केसरीकारांनीं म्हटलं होतं की, डॉ. आंबेडकरांनीं जें विचार मांडलें ते एकाद्या कट्टर राष्ट्रीय पुढाऱ्यासारखे आहेत एवढी निर्भीड टीका डॉ. साहेबांनी केलेली आहे, दुर्दैवाने वर्तमानपत्रें मासिकें फारसी सहाय्यक नसल्यामुळें हे त्यांचे लेख सर्वसाधारण नजरेसमोर येऊं शकत नाहींत. डॉक्टरांच्या धनवान चहात्तांनीं सहाय्य करून त्यांचे लेखन प्रकाशित करावे. ( दोंदे जनता खास अंक ) आजपर्यंत बाबासाहेबांचें सर्व लेख इंग्रजीमधून लिहिले गेलें असल्यामुळे इतर भाषीय लेख या आस्वादाला मुकले आहेत. मराठी मनें तर कुचंबली आहेत.

ज्ञानधनाचें साधन जे ग्रंथ त्या ग्रंथावरील त्यांचे प्रेम—माणूस स्त्रीप्रेमावर जेवढा आसक्त त्या आसक्तीपलीकडे ते व्यक्त करतात तसेंच ग्रंथालयाबाबत तर ते म्हणतात, “ प्राप्त परिस्थितीने माझे घरांतील पुस्तकें कोणी नेऊं लागला तर त्यास प्रथमताच मी फटकरल्याशिवाय राहणार नाहीं–”

संस्कृतीसंबंधानें डॉ. आंबेडकर म्हणतात, “ अस्पृश्य वर्गाचे अस्तित्व असणें ही एक तिरस्कारणीय बाब होऊन बसली आहे. हिंदु संस्कृतीचे महत्वमापन वरील गोष्टीच्या प्रकाशांत केलें तर तिला संस्कृति म्हणणे कठीण आहे. मानवतेस दडपून तीवर गुलामगिरी लादण्याची

अधमपणाची हिकमत आहे. बदनाम संस्कृति हेच तिचं खरं नांव आहे. जीवनाचें साधन म्हणून एका वर्गानें गुन्हेगारीचे धंदे चालवावेत, दुसऱ्या वर्गानें कमालीच्या रानटीपणांत रहावे आणि तिसऱ्या वर्गानें मानवी देवघेवीपासून दूर राहावे. व त्यांच्या केवळ स्पर्शान विटाळ मानला जावा, अशी शिकवण ज्या संस्कृतीची आहे, तिला बदनामीशिवाय दुसरे काय म्हणावे ? अशा या बदनाम संस्कृतीच्या पुरस्कर्त्या विद्वानासंबंधानें ते म्हणतात. हिंदु संस्कृतीच्या अद्वितीय-पणाच्या समजुती निखालस चुकीच्या आहेत. यांत शंका नाहीं. परंतु अशा लबाड समजुतींतहि हिंदु संस्कृतीचे स्वास्थ्य, उच्चपण आणि पावित्र्य आहे, अशी शिकवण देण्यांत आली. हिंदु विद्वानांचें सामाजिक मासशास्त्र विशिष्ट तऱ्हेचे आहे. आणि तेंच या शिकवणूकीस सर्वथा कारणीभूत आहे.

आज तरी सगळी विद्वत्ता ब्राम्हणाच्याकडे राहिली आहे. तथापि व्होल्टेअरची भूमिका घेण्यासाठी एक देखील विद्वान ब्राम्हण पुढे सरसावला नाही. व्होल्टेअरपाशीं बुद्धीचा प्रामा-णिकपणा होता. तो स्वतः ज्या कॅथालिक चर्चमध्यें वाढला. त्या चर्चच्या तत्वप्रणालीविरुद्ध त्यानें आपला आवाज उभा केला असा व्होल्टेअर ब्राम्हणामध्यें भविष्यकाळांतही उमटण्याची चिन्हें दिसत नाहींत ब्राम्हणामध्यें एखादाहि व्हेल्टेअर निर्माण झालेला नाहीं, या घटनेंत ब्राम्हणी विद्वत्तेनें गंभीररूप प्रतिबिंबित होते, परंतु याबाबत आश्चर्य करण्याचे कारण नाही ब्राम्हण केवळ पढलेला ( वाचन ) झालेला आहे तो बुद्धिमान् नाहीं. पढत मनुष्य व बुद्धिमान मनुष्य या दोहोंमध्यें जमीनअस्मानांचा फरक आहे, पढत मनुष्यास आपल्या वर्गाची जाणीव असते; व स्ववर्गाचे हित संरक्षितो. बुद्धिमान मनुष्य हा सर्वस्वी मुक्त असतो. आणि तो स्वतंत्र बाण्यानें वागतो. त्याच्या कृत्यांवर वर्गाच्या हितांचे कसलेच दडपण नसते; याच कारणा-साठी ब्राम्हणलोक म्हणजे केवळ पढत माणसें राहिलीं; आणि त्यांना एखादा व्होल्टेअर निर्माण करतां आला नाहीं.

खरेच ब्राम्हणांनीं एखादा व्होल्टेअर कां निर्माण केला नाहीं ? या प्रश्नांचे उत्तर फेर-प्रश्नांनीं देतां येईल. तुर्कस्थानच्या सुलतानानें मुस्लीम जगताचा धर्म का नष्ट केला नाहीं ? पोपनें कॅथॉलिक पंथाचा कां निषेध केला नाहीं ? ब्रिटिश पार्लमेंटनें अस्मानी डोळ्यांच्या छोकऱ्याची कत्तल फर्माविणारा कायदा कां पास केला नाहीं ? तुर्की सुलतान पोप अगर ब्रिटिश पार्लमेंट यांनीं ज्या कारणासाठीं वरील गोष्टी केल्या नाहींत. याच कारणासाठीं ब्राम्हण लोक एखादा व्होल्टेअर निर्माण शकले नाहीत. स्वार्थामुळें मग तो व्यक्तीचा असो अगर वर्गाचा असो बौद्धिक मार्गदर्शनावर अंतर्गत मर्यादा येऊन बसतात हे कबूल केलें पाहिजे. हिंदु संस्कृतीमुळें ब्राम्हणांन

सध्याचा दर्जा व सत्ता प्राप्त झालेला आहे. अशा या बदनाम संस्कृतीसंपन्न पुरस्कारीत वाङ्मय यांच्या मूल्यमापनासंबंधीं ते म्हणतात—

परंतु याहिपेक्षां दुःख देणारी गोष्ट अशी कीं, कोणी ब्राम्हणी वाङ्मय चव्हाट्यावर आणण्याचा प्रयत्न केला तर तो प्रयत्न ब्राम्हण विद्वानाला सहन करवत नाही.. जेथें आवश्यक आहे तेथें ब्राम्हण स्वतः मूर्तीभंजकाची भूमिका वठविण्याचे सामर्थ्य आहे त्यास ती स्वीकारूं देणार नाहीत. कोणी एखाद्या ब्राम्हणेतराने असा प्रयत्न केला तर ब्राम्हण विद्वान कटबाजी करून संपूर्ण मुग्धता स्वकिारतील. त्याची दखल घेणार नाहींत. फुसक्या मुद्यावर त्यांचा धिक्कार करतील अगर त्याचे कार्य रद्दी म्हणून डबक्यांत फेकून देतील. ब्राम्हणाच्या वाङ्मयावर प्रकाश टाकणारा एक लेखक या नात्याने अशा नींच मसलतीत बळी पडलेल्यापैकी मी एक आहे.

सत्य संशोधनासंबंधानें " गाथेच " मत उदधृत करून पुढें म्हणतात. अस्पृश्यतेशीं संलग्न असणाऱ्या प्रश्नासंबंधीं संशोधन करतांना अशा अनेक घटनांना तोंड देणारा मी एकटाच नाहीं. हें खरं आहे. हिंदुस्थानच्या पुरातन इतिहासाचें संशोधन करणाऱ्या सर्व अभ्यासकांना अशा तुटक घटनांशीं तोंड द्यावे लागलें आहे. ऐतिहासिक ग्रंथांच्या टीकाकारांना उद्देशून ते म्हणतात--

ऐतिहासिक अनुमानाचे महत्वमापन करणारे कांही शास्त्रीय नियम असतील तर, प्रत्यक्ष पुरावा अनुमानांचा पुरावा, उत्तर अनुमानाचा पुरावा विरुद्ध अंदाजी पुरावा या गोष्टीवर टीकाकारांनीं आपले लक्ष केंद्रीत करूं नये. अस्पृश्यतेसंबंधीं माहिती देणारी कांहीं क्रमिक पुस्तकें ( Texs ) उपलब्ध नाहींत; आणि जी कांहीं थोडी पुस्तकें आहेत. त्यामध्यें प्रत्यक्ष पुरावा सांपडूं शकत नाहीं. अशा परिस्थितींत उपलब्ध पुस्तकें कोणत्या गोष्टी सुचवितात व कोणत्या गोष्टी लपवितात हें एवढेंच पाहतां येईल. बिनचूक सिद्धांत निघतील असे नाहीं. जे अवशेष उरले असतील ते गोळा करून क्रमाक्रमानें एक आणून त्यांना आपल्या जन्माची कथा सांगावयास लावण्याचे हे कठीण कार्य आहे. ज्याप्रमाणें एखादा पुराणवस्तु संशोधक मोडतोड झालेल्या दगडापासून शहरांचा इतिहास कथन करतो, अथवा भूगर्भशास्त्रज्ञ भूगर्भीतील प्राचीन काळच्या सांगाड्यावरून तत्कालीन भावनाची कल्पना देतो, अगर चित्रकार क्षितीजाची व डोंगराच्या कडांची चिकित्सा करतो, त्याप्रमाणें अस्पृश्यतेच्या संशोधनाचे कार्य आहे. या दृष्टीनें पाहिले तर सदर ग्रंथ ऐतिहासिक ठरण्यापेक्षां ते केलेल्या कार्यातच अधिक जमा होतील. ज्या प्राचीन काळांचा कोणासहि अंत नाहीं, अशा काळांत अस्पृश्यतेचें मूळ गडप झालें आहे. हें गडप झालेले मूळ समाजावस्थेंत शोधून आणणें म्हणजे पिढ्यान् पिढ्या माहीत नसलेल्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................... दि: ..................
क्रमांक .................... नों: दि: ..................

शहराची इतिहासांत नोंद करून मूळावस्थेपासून स्थिति निवेदन्यासारखे आहे. यास्तव सदर संशोधनाच्या कार्यात कल्पना व अनुमान यांचा उपयोग अपरिहार्य आहे. मात्र एवढयाच कारणास्तव प्रबंधाचा धिक्कार करतां येणार नाहीं. कसलेल्या कल्पनाशक्तीशिवाय शास्त्रोक्त संशोधन होऊ शकत नाहीं. अनुमान हा तर शास्त्राचा आत्मा आहे. यासंबंधीं मॅक्झीम गॉर्की म्हणतो--

" एकमेकांस लागू होणारे अनेक मुद्दे शास्त्रांत व वाङ्मयांत आहेत. निरीक्षण, तुलना आणि अध्ययन या गोष्टी दोहोंतहि मूलभूत महत्वाच्या आहेत. शास्त्राप्रमाणें कलावंतास कल्पना-शक्तीची व उपजत ज्ञानाची आवश्यक आहे. घटनांच्या मालिकेंत पडणाऱ्या खंडांत कल्पना-शक्तीनें व उपजत ज्ञानानें भर घालतां येते. त्यामुळें शास्त्रज्ञास अनुमान तयार करता येते. आणि निसर्गाचे स्वरूप, प्रतिक्रिया इत्यादीसंबंधीं उपपत्ती लावण्यासाठीं बुद्धीस यशस्वी रीत्या मार्गदर्शन करतां येते. हे कार्य वाङ्मयीन असते. व्यक्तिचित्रें निर्माण करण्याचें असते. या सर्वांसाठीं कल्पना, उपजतबुद्धी आणि मनाचा निश्चय करण्याची कुवत यांची आवश्यकता असते."

औरंगाबाद येथील साहित्य संघास डॉ. बाबासाहेबांनीं भेट दिली. असतांना भाषण करतांना म्हणाले होते. " लिटरेचर " या इंग्रजी शब्दाचे हे चूक भाषांतर आहे. साहित्य स्वयंपाकाचे असते, हजामतीचे असते. त्या अर्थानें साहित्य या शब्दाची येथें समर्पकता पटणार नाहीं नव्या साहित्याचे आपण वाचन करीत नसल्याचे सांगून ते म्हणाले कीं, " ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकारामाची गाथा वगैरे वाचतों." ज्ञानेश्वरीविषयीं बोलतांना ते म्हणाले, ज्ञानेश्वर मोठा विद्वान होता; पण माझी एक शंका आहे. सर्व ज्ञानेश्वरींत ज्ञानेश्वरांनीं वेदांत विषयांवर भाष्य केले. ब्रह्म हे सत्य आहे व ते सर्वव्यापी आहे असे ज्ञानेश्वर म्हणाले, पण ज्ञानेश्वरीच्या शेवटीं; त्यांनीं चातुर्वर्णाचे हिरीरीनें समर्थन केले. मुद्दा स्पष्ट करतांना ते म्हणाले की, ज्ञानेश्वर व त्यांच्या इतर भावंडांना ब्राह्मणांनीं जातीबहिष्कृत केले होतें. त्यांना पुन्हां जातीत जावयाचे होते. यामुळेंच त्यांनीं रूढ चार्तुवर्णाच्या कल्पना उचलून धरल्या व समाज दंडापुढें कच खाल्ली. ब्रह्म जर सर्वव्यापी आहे तर ज्ञानेश्वर असे म्हणूं शकले असते कीं तुम्ही मला बहिष्कृत केले, मी महारवाड्यांत राहीन. त्यांच्यांतही ब्रह्म आहे पण असें, म्हणण्याऐवजीं त्यांनीं रेड्यामुखी वेद बोलविला. हा रेडा तेव्हांपासून मात्र मुका झाला आहे.

तसेच शाहिरीहि लावणी व जुन्या वाङ्मयांच्या जीर्णोद्धाराबाबत ते म्हणतात, " मराठी वाङ्मयाची अनेक दिशेनें प्रगति होत असल्याचे अनेक मराठी साहित्यांकडून ऐकण्यांत येते. यासंबंधानें नाझ्यासारख्या केवळ जुन्या वाङ्मयांवर वाढलेल्या माणसास मत देणें हे उचित होणार नाहीं. तथापि जुन्या आणि नव्या मराठी वाङ्मयाचा परिघ तपासून पाहतांना हल्लींच्या

चालू वाङ्मयांतून कांहीं प्रकारचे जुनें वाङ्मय गळून पडले आहे नव्हे नामशेष झाले आहे असें म्हणणें आतां आततायीपणाचें होणार नाहीं. असें मला निश्चितपणें वाटतें. जुन्या वाङ्मयांत लावणी आणि गाऱ्हाणे यांचा समावेश बऱ्याच मोठ्या प्रमाणांवर होत असे. परंतु आजकालचें वाङ्मय पाहिलें असतां त्यांत या दोन प्रकारच्या वाङ्मयाचा लवलेश किंवा नामनिर्देशसुद्धां सांपडत नाहीं. लावणी आणि गाऱ्हाणें ही कमी प्रतीची असे जरी मानले तर लालित्य आणि नवलाई यांच्या दृष्टीनें अशा प्रकारच्या वाङ्मयास कमी प्रतीचे मानता येणार नाहीं. हे वाङ्मय नाश पावलेलें पाहून मला खरोखरच मोठा खेद होतो. या वाङ्मयाचा संग्रह करण्याचा एके-काळीं मानस होता, परंतु कार्य बाहुल्यामुळें ते कार्य मला तडीस नेतां आले नाहीं.

अशा तऱ्हेनें त्यांना मराठींत जी ग्रंथ रचना करावयाची होती त्या ग्रंथाच्या भाषेसंबं-धानें ते म्हणतात, ' ग्रंथाची भाषा जीवंत व नारळी पाण्याइतकी मधूर अशी असावयास हवी. या ग्रंथाच्या वाचनानें माणसाची झोप उडून जावून त्यांची विचारशक्ति जागृत झाली पाहिजे. या ग्रंथाची लेखन शैलीहि प्रासादिक, सुमग, उत्तेजक व वाचकांची तंद्री लागेल अशा दर्जाची असावयास पाहिजे. ''

या दृष्टीनें खालील योजनेवर त्यांचे ग्रंथलेखन अवलंबून होते. लोक शिक्षण प्रसारक मंडळ ( एक योजना ) व महात्मा फुले यांचे एक विस्तृत चरित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीं लिहिण्याची तयारी चालविली असल्याचे वृत्त कांहीं दिवसापूर्वीं प्रसिद्ध झालेले आहे. हे चित्र आणि महात्मा फुले यांचें समग्र लिखाण किंवा त्यांच्याबद्दलच्या आठवणी आणि इतर वाङ्मय हे सर्व छापण्यास पुष्कळच पैशाची गरज लागणार आहे. महात्मा फुले यांच्यावरील ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर लोकहितवादी राजारामशास्त्री भागवत, आगरकर, यांवरही अशाच तऱ्हेचे विस्तृत ग्रंथ लिहिण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनांत होते. या विषयासंबंधीं खुद्द डॉक्टरांशीं गेल्या बुधवारी आम्ही कांहीं मंडळींनीं चर्चा केली. त्यामधून जो एक विचार निर्माण झाला तो मी या पत्राच्या द्वारे महाराष्ट्रापुढें मांडत आहे महात्मा फुले, लोकहितवादी राजारामशास्त्री भागवत आणि स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महाराष्ट्रांतल्या बहुजन समाजाचे खरे उद्धारकर्ते होत. विचारांचा नवीन प्रकाश त्यांनीं महाराष्ट्राला दिला; आणि खरीखुरी लोकजागृति घडवून आणली. म्हणून त्यांची चरित्रें, यांचे वाङ्मय आणि यांचे विचार बहुजन समाजाच्या अगदीं खालच्या घरापर्यंत जावून पोहोचावयास एक प्रकाशन मंडळी स्थापन करण्याचे आम्ही योजिले आहे. या रुपयाचे दहा हजार भाग विकून जमा करण्यांत यावे असे आम्हास वाटते. म्हणजे सर्वसामान्य माणसालाहि यांचे सभासद होतां येईल. मंडळीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टरचे प्रमुखपद स्वीकारण्यास डॉ. आंबेडकर यांनीं संमति दिली होती. त्यांनीं

कोणत्या तऱ्हेनें या कार्याला आपणाला मदत करतां येईल याबद्दल आम्हाला ताबडतोब लिहून कळवावे, म्हणजे या योजनांना महिन्या दोन महिन्याच्या आंत मूर्त स्वरूप देण्याचे कार्य करण्यास आम्हांला हुरूप येईल. (प्रल्हाद केशव अत्रे नवयुग ता. १४ मार्च १८४८) याचप्रमाणें श्री. बी. सी. कांबळे जनता दि. २०-३-४८ च्या अंकांत म्हणतात. " अद्याप हिंदराष्ट्र एक जिनसी, एकजिवी, व भक्कम पायावर निर्माण व्हावयाचें आहे. त्यासाठीं वरील योजनेंत प्रवृत्त होऊं पहाणारी लोकसंग्रही व बुद्धीवादी विचारसरणीच हवी."

या योजनेमुळें अबाधित मूल्याचे लोकवाङ्मय पुरविले जावूं शकेल. आपल्या देशामध्यें विकृत विचारसरणीची एक मोठी साथ कित्येक दिवसापासून ठाण मांडून बसली आहे.

अशाच प्रचार करणाऱ्या ग्रंथावर हल्ले चढवून त्यांतील भोळेपणा दाखविला तरच पुढील प्रगतीचा मार्ग साफ होईल. तेव्हां लोकशिक्षण प्रसारक मंडळास दोन तऱ्हेचे कार्य करावे लागेल. प्रथम विकृत व गोठाळलेले विचारप्रवाह नेस्तनाबूद करणें भाग पडेल नि नंतर शुद्ध, बुद्धिवादी व लोकसंग्रही वाङ्मयाचा प्रसार करावा लागेल. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखालीं या संस्थेची निःसंशय भरभराट होईल. अखिल जनता या योजनेस आपआपल्या मजदूराप्रमाणें हातभार लावील. असा आम्हास भरंसा वाटतो. अशाच प्रकारानें श्री. रा. टिकेकर ' लोकहितवादींची शतपत्रें ' या प्रस्तावनेंत म्हणतात. 'प्रथम माझा बेत शतपत्राची संक्षित आवृत्ति काढावी असा होता. कारण पुष्कळ पत्रांत पुनरुक्ति झालेली आहे. परंतु तसे केलें असते; तर लोकहितवादींची खरी कर्तबगारी वाचकांना समजली नसती. शिवाय कृ. पा. कुळकर्णी, डॉ. भि. रा. आंबेडकर इत्यादि विद्वानांचे मत शतपत्रें समग्र असावी असेंच पडले. यावरून जुन्या सत्य-शोधनार्थ लोकशिक्षण प्रसारक मंडळ स्थापून त्याद्वारें मराठींतून बाबासाहेबांच्या लेखणींतून उत्कृष्ट पुस्तकें निर्माण करणें व ही तयारी त्यांची नवीन नसून जुनीच होती. ' भि. रा. आंबेडकर चरित्र भाग २ रा मध्यें श्री. खैरमोडे आठवण देतांना सांगतात कीं, 'रासगर्भाची चाल फोडणारे गुजराथी गृहस्थ गोवर्धनदास त्यांचे चरित्र गुजराथींतून मराठींत लिहा व हें झालें नाहीं म्हणून ते म्हणाले, ' अरे ! असेंच तुम्ही रडे सबबी सांगत रडणार ! '

या क्षेत्रासंबंधानें बाबासाहेबांची मनोभूमिका काय हे वरील गोष्टीवरून कळून येईलच. राम पाठडे आठवण देतात कीं, एका बोर्डिंगचे उद्‌घाटन प्रसंगी साहित्यिकांची वाढ मी माझ्या समाजांत वाढविण्याचा प्रथम प्रयत्न करणार आहे. एकूण त्यांच्याच आशिर्वादाखाली चाललेली महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषद ही संस्था डॉ. आंबेडकरांचे वाङ्मयीन चिरस्मारक करीलच !

* * *

# भीमयुगाचे साहित्य व समालोचन

' विद्या देवम् परतम् ' अशी विद्येची थोरवी; परंतु वेदादि धर्म ग्रंथांनीं मात्र कडक-निर्बंधाखालीं स्त्री व शूद्र यांना विद्या पारखी केली. वेदकालांत स्त्रियांनी विद्या संपादन केल्याचे दाखले आहेत. पण दलितांना मात्र विद्यामंदिर कायमचें बंद होते. बाकीच्या सर्व वर्गांना इतिहास कालापूर्वीपासून तहहयात शारदे कृष्णप्रसादें, सरस्वतीच्या छत्राखाली गणरायाचे स्मरण करून पांढऱ्यावर काळे करून वाटेल तसा हैदोस धुडा घालण्याचा मक्ता दिला होता. त्याचवेळीं दलित ससाज अज्ञान गर्तेत अनन्वित हाल अपेष्टांत कृमी किटकासारखे जिणे जगत होता. ना इच्छा ना भावना, मनाचे सर्व व्यापार बंद, खालच्या घासाचा इमानी जोहार करीत पशूसारखे राबणे एवढेंच त्यांचें जीवित कार्य ! विधात्यास सुधारता येणें अशक्य अशा दलित समाजाला " रात्रीच्या गर्भात उद्यांचा असे उषःकाल " ही कल्पनासुद्धां नसेल. पण " प्रसवे असव सुवर्ण अरुणा, उषा प्रसवतते अनंत किरणा " याप्रमाणें या गाढ तिमिराच्या अवसेतून भारतीय नवा मनु उदयाचली आला. त्यांच्या स्वयंतेजाची अनंत प्रकाश किरणें जसजशी डोकावूं लागली तसतसे " भिमरवीच्या किरणे केल्या काबीज दाही दिशा " हे हल्लीच्या जगास सार्थ समजले. या कुशल शिल्पकारानें अविश्रांत मेहनत घेऊन ओबड धोबड दगडावर हळूवार हातानें टाकी चालविली व दगडाला देवपण दिले; प्राण भरला; भावना चेतविल्या आणि त्याकरवीं ' माणुसकी हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे ' या महामंत्राची गगनभेदी आरोळी उठवून अखिल जगास विशेषेकरून चातुर्वर्ण्याची तटबंदी कायम ठेवून आपले प्रभुत्व निर्धास्त राखणाऱ्या सनातनी धर्ममार्तंडांना जोराचा हादरा दिला.

उत्क्रांतिवादी या स्थित्यंतराकडे विकासबुद्धीच्या दृष्टीनें पाहतील व असे होणारच होते असे म्हणतील. पण उत्क्रांतीवादाचें तत्व मान्य करूनहि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं

दलित समाजपुरुषांस घोर: निद्रेतून जागे केले, त्यांस चेतनामय बनविले, ध्येयाचा मंत्र दिला, सिद्धीचा मार्ग दाखविला, हात देवून उठविले, प्रवासांत साथ दिली, हे कोणास नाकबूल करतां येणार नाही. काळाच्या पोटांत दलितांच्या हलाखीचे हलाहल भिनत होते. आणि स्पृश्या-स्पृश्यांत त्याची परिणति फारच वेगळीं होऊं लागली होती.

दलितांचे हृदयांतील जातिभेदाचे उश्वास १८८८ मध्यें गोपाळबाबा वलंगकरांनीं शास्त्री पंडीतांना ऐकविले; नंतर बाळकदासाच्या महारमहात्म्यास अनुसरून श्री. शि. जा. कांबळे यांच्या सूचिपत्रानें तोच अनुभव १९२० पर्यंत घेतला. तेथपासून दलितोद्धाराच्या चळवळीचा हिल्लाळा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याकरवी महाराष्ट्रावर पसरला. त्यामुळें दलितांच्या मानेवर आडदांडपणें कोलदांडा घालून बसलेलें जुन्या रूढीचे भूत थोडे किंचाळूं लागले. अशा भूतास "बहिष्कृत भारत" व "मुकनायक" यांच्या टाकांच्या फेकीचे उद्वेगी सपकारे असे कांही बसूं लागले की ते भूत त्यावेळींच सैरावैरा पळालें. अर्थात या भूतानें पिछाडलेला दलित समाज मुक्त झाला. तरी परिस्थितीनें मात्र व्याकूळ होता. १९३० सालीं भाषाभूषण चांगदेव यांनीं आपल्या प्रतिभेच्या प्रभावी मंथनांतून मिळविलेल्या "अमृताचें" सिंचन केलें त्यामुळें समाजाला नवचैतन्य आले, उमेद बळावली. श्री. पवारचे दलित हितशत्रूला "चाळीस सवाला" ची लोखंडी चण्याची जबर मेजवानी देवून त्यांचे थोबाड बंद केले.

नव उमलत्या चैतन्यानें प्रेरीत झालेल्या अभिनव जागृतीची स्वागत गीतें अनेक शाहीरांनीं गाईली. भाग्योदय उषःकालीच्या भुपाळ्या रोकडे, उद्धव, मोरे, चांगदेव मोहिते, वराळे व हरिभाऊ तोरणे इत्यादिंनी गाऊन सहर्ष स्वागत करून नव क्रांतीचे तोरण बांधले होते. पुणें कराराच्या प्रारंभिक संगरांत दलित नृत्य पुर्णविद्यमान झाला असतांना किती तरी काव्य भृंगांनीं आपल्या मंजूळ गुंजारवानें या भीम भास्कराची स्तुति स्तोत्रें गाईली.

तरीसुद्धा काही समाज कंटकांनीं म्हणजे भाई अमरसिंह, जाधव, साळवी व बंदसोडे इत्यादींनीं महार चांभारांत द्वेषाचा सावळागोंधळ पसरवून अस्पृश्यांचे धर्मांतरावर घणाचे घाव घातले होते.

पुढच्या काळांत दलितांचा हृदयेश्वर अखिल भारतीय भूमंडळ गदगदा हलविण्यासाठीं गुंतला असतांना इकडे महाराष्ट्रांत खवळलेले समाजरूपी व्याघ्र अन्य परवशता तोडण्यासाठीं डरकाळ्या फोडीत जीवाची तगमग व्यक्त करूं लागला. तेव्हा ही गोष्ट लक्षांत घेऊन त्यास त्यांच्या कर्तव्याची जाणीव देण्याखातर "विसाव्या शतकांतील गुलामगिरीचा" संजीवनीमंत्र त्याच्या दैवतानें दिला. मग तर याच्या रूद्र संचाराला पारावारच नाहीं. अकाळ

विक्राळ गगनभेदी गर्जनांनी सारा दिग् महाराष्ट्र दणाणून सोडला. या बेट्यानें, तेवढ्यांत या सुद्धा स्वारीला परावलंबी रहावे लागलं. हे पाहून भीम प्रभूनें स्वयं सिद्धते खातर त्यांस "मुक्तिकौन पथे ".चा हिल्लाळ मार्ग दर्शनास्तव दिला. यामुळें या समाज व्याघ्राचे रोमरोमी नव चैतन्य भिनून त्यानें महाराष्ट्राचे आसमतांत धर्मांतरांची हिमलाट उसळवून दिली. दलितनृप इंद्र प्रस्थात " सवतीच्या पोटदुखी "वर पोटीस बांधून यांच्या हितकारिणी झगडत होता. अशा या काळांत अनेक भाट भ्रमरांनी सुरेल स्तोत्रें गावून काव्य कुसुमे उधळून या दलित जागृती प्रगतीचे अभिनंदन केले अगोदरच कै. शि. जा. कांबळे यांच्या " चारित्रा " सोबत कद्रेकरांनी " तुकारामाची गोष्ट सांगितलीच होती. पुढे भडकनाथ मोरें, निवृत्तीदास व कि. फा. बनसोडे इत्यादि संतांनी एकतारी घुमविली तर घेगडे, कर्डक, बनसोडेची ढोलकी सह्यघाट माथ्यावरून घुमत होती. सोनताट्याचा महाडचा डफ सभामंडप हादरून सोडीत होता. खोल-वडीकरांचा " माणुसकीचा मंत्र " अडांगळेचा " बिगूल " चंडोलचा " रणडंका " इशारे देत होता. गडकऱ्याचें समतेचं रणशिंग साताऱ्च्या अजिंक्य ताऱ्यावरून अस्मान निनादीत होते. अशा ह्या मंगल गीतांचा रणघोष माणुसकीच्या संग्रामी आघाडीवर होता. अशारितीनें या समाज-रूपी नरव्याघ्राला आंजारीत गोंजारीत या गणगंधर्वांनी १९४२ मध्यें अखिल भारतीय स्वतंत्र नरेंद्र म्हणून त्यांच्या सह नरेंद्र सम्राटांस शे. का. फे. च्या मसनदीवर आणून भुषविलें.

या मंगलविधीला दिष्ठ लागूं नये म्हणूनच कीं काय श्री. डोळस यांनी कॉंग्रेसची " चौदा सवालाने, " डोळेफोड केली. तसेच शिर्के यांनी " इंग्रजी सत्तेंत दलितोन्नतीचे कानू " दाखवून बाबासाहेबांची " सहाभाषणें " ऐकविली. दत्ता कट्टीनी " आंबेडकरांनी काय केले " या समग्र निवेदनानें सराईत रान मोहरून टाकलें. भातनकरांनी " भीम चरित्राची " छोटी पोथी नरेंद्रास दिली. शिवाय केळशीकरांनी देवरुखकरांच्या " मनोराज्य " मदीरेची कळशीं भरून नरेंद्रास धुंद करून सोडले.

पुढील भारतीय समरांत अडांगळे, शंभु तायडे, मानवटकर यांची " भिम पंचरत्नी गीता " बोधामृत पाजूं लागली. नागपूरच्या ना. रा. शेडें यांनी " दलितास उद्देशून " लिहतांच आवळेची " घटना "पुढे आलीं. तसेंच माळवे, हातनोरकर, कर्डक, पवार, कांबळे, भालेराव, दिगंबर, वाघमारे आणि गायकवाड इत्यादि कलावंतांनी नितांत मधुर गानरस पाझरून नरेंद्रास गान लुब्ध करून सोडले. याशिवाय रणपिसे, चोपडे यांनी " समतेच्या नौबती " वाजवीत क्रांति गर्जना केली. श्रीधरचा " भीमसंदेश " राजानंदाचा " भीमप्रकाश " स्पर्धा करीत असतांना शेजवळाची " चिखलांतील कमळें " उमलली. सांगलीच्या कांबळेचा " गरिबांचा कैवारी" सगळीकडे मशहूर झालांच होता शेजवाळांचे "आमचे आंबेडकर" श्री माधव कुंभारचे

'मुलांचे आंबेडकर' या सार्थप्रती नरेंद्राहाती परमार्थ ठरल्या. वागविलासपटू श्री बी.सी. कांबळे अनुवादीत "संयुक्त महाराष्ट्र मोहोरकीची मुसंडी," शिवाजी पार्कला जबर धडकली व भारतीय घटनेच्या तीन भाषणाचा त्रिशुळ पारजून पांचवडकरानी अभिनव कामगिरी केली.

श्री. भंडारेनी महार वतनाला ब्रह्मपुरींत गदगदा हालविले. पुढें श्री बी.सी. कांबळे यांनी तर समतेच्या मूळभूमिकेचे स्वरुप दाखविलें ते म्हणजे "अस्पृश्य मुळचें कोण व ते अस्पृश्य कसे बनलें ?" दामाजीचा "भिमसंदेश माननीय झाला होता. परंतु पुढे अंतिम सत्य "शुद्र पूर्वी कोण होते ? हा ग्रंथराज उघडून श्री. खैरमोडे यांनी साऱ्या टवळांची खैरच मोडली. सुतळेचा समरशांतीस्तव "दलितांचा देव" प्रगट झाला खरा पण त्यांचे पाठीमागील फिरण्याच्या बिंबाकार सुदर्शनचक्राच्या दिव्य प्रकाशांत पांच भागांत इतिहासभेदक खैरमोडेकृत "भीमचरित्राची" दिव्य ज्ञानेश्वरी दलितांची गीता वाट चालत असलेली दिसली.

या महान ग्रंथराजाच्या दोन भागाची पारायणे चालू असतांना मध्यंतरातील शांतीच्या साम्राजांत वि. तु. जाधवाचें "राजा सुदास" नाटक पहात भगवान बुद्ध आंबेडकरी ब्राह्मणासह गत मनोव्यापाराचे अवलोकनार्थ आपल्या प्रतिबिंबातून जुना इतिहास दाखवूं लागले. त्यांत ब्रम्हर्षि हरिभाऊ तोरणे यांनी शास्त्रशुद्ध अशी "चावडीतील बैठक" चपखल बसविलीं. तीत "नवयुग भजनावली" गात गात सनातनी नत दृष्टांना संगीत धोपाट्या घालीत शेवटी त्यांच्या "चोखामेळ्याची पंढरपूरांवर स्वारी" त्रैलोक्यांत दुमदुमली. तसेच पुण्यांत गायकवाडांच्या "जाती भेद उच्चाटणा"सह शकुंतलाबाई वायदंडे याचे "अस्पृश्याचे राजकीय हक्क" भटाब्राम्हणाने उचलून धरलें होतें. नुकतेच कुठे सिद्धार्थ बौद्धायनाचे मंगला झळकू लागल्या असतांना नाविन्य कुमारांची "निवडणूक मोहिम" गाजल्यावर श्री. भा. शि. बाभळे यांच्या "जातिभेद समस्येवर" साहित्यरत्न मा० सो० कांबळ्यांचा "लागाबांधा" जोडणारा दलितांचा हिरा उपयुक्त ठरला. याशिवाय काव्य रत्नावलींत नागपूरकडील दीनबंधू महाराज "पाळणा पोवाडा" गात "दलित जागृतीस" चेतना देऊन तिचा "उद्धार" करीत होतेंच. विजय कांतांस बाबा गोविंद 'अस्पृश्य दर्शन' नागपुरी आवाजांत दाखवित होते. याशिवाय वि. ग. खरात, ना० थो० बाबर, ना. ग. कदम, दौलत करणुजी कांबळे, एल. जी. पवार, गुलाब जगताप, जे.टी. कांबळे, शरद म्हातेकर, बी.के. गांगुर्डे, गंगाराम मास्तर, वगैरेच्या पदावल्या ललकारत असतानांच, एस. के. पवारांच्या लोकगीतासह विठ्ठलनाथ कांबळे, घनःश्याम, भी. धो. कर्डक, मधुदकर, एस. वाय. खरात, विठ्ठल शिंदे वगैरेचे हॅन्डबिलवजा पदावल्या लहिऱ्या मारतच होत्या. अशी किती तरी कर्णीकार कलावंतांची भरती होत होतीच आणि किती तरी गान लुब्धांची संगित कलोपासकांच्या भरारीतून तरंगत होतीच.

मानवी मनाच्या अध्यात्म शांतीत्वाचे वेद दलित नृपाकरवी नजीक येऊ लागलें. सहस्त्र रश्मी दिवाकराप्रमाणें उर्वरीत आयुष्यांत पददलितास्तव केलेल्या सर्व कृतृत्वांची सांगता निकट येवून ठेपली. व त्या दैदिप्यमान् तेजांतील एकेका सूक्ष्म रश्मीकडे आशाळभूत भाविक दलित बेभानपणे अवलाकने करूं लागला. आणि जें दिसलें सांपडलें तें हरएक कलावंत आपल्या प्रतिभेनें नव्या जगाला दाखवूं लागला. अगदी मिळेल त्या मार्गानें, सांपडेल त्या वाटेनें कवि लेखकादि कलावंतांनी ज्यावेळीं फुलांच्या करंड्या उधाळल्यासारख्या आपल्या कलाकृति समाज पुरुषांवर उधळल्या.

गद्यापद्यादि सर्वानंदानें दलित समाज परिपूर्ण भारला. नागपूरचा धर्मक्रान्ती परीवर्तन दिनाचा अपूर्व सोहळा पाहून किंकर्तृव्यमूढ झाला. संकल्पाला आभाळ थोटकें झालें पण...... लौवकरच वज्र घाती महान दुर्दैव ओढवलें. या सर्व गणगंधर्वांनी भाट भ्रमर गुणवंताना ६ डिसेंबरला दादर चौपाटीवर श्रद्धांजलि वहावी लागली. दादर चौपाटीवर मानबी दर्याला दुःखाचे उधाण आले त्याला लाजून साक्षात सागर कोसभर हटला. श्रद्धांजलीच्या ओंजळी अर्पून परतणारा दलित बौद्ध माणूस स्मृतिगंधाच्या स्मरणी घोकत मावळत्या सूर्यबिंबाकडे एक टक पाहू लागला......मी तुम्हाला बौद्धधर्मासंबंधानें लौकरच एक छोटे पुस्तक देणार आहे.....मला फार लिहावयाचे आहे. मला इज्जत प्यारी आहे. स्वाभिमानाने जगा त्याकरितां आणखी झगडा......यासाठी मी तुम्हांला बुद्धाच्या ओटींत घालतो.

सांत्वनार्थ गायकवाड, कर्डक, तळवटकर आठवणीचा 'परिमल' पसरवून दुःख हलके करतात आणि वरीष्ठ संचालक कमिटी विश्वबंद्य 'बुद्ध ॲन्ड हिज धम्म हा ग्रंथराज अर्पण करते झाले मानव हांसला, खुलला. त्याने पुढे नजर वळविली. कुलाबा तु. म. साळवे गुरुजी जयभीम गोड गोष्टी, आंबेडकर जीवनकथा, भारतीय घटनेचे शिल्पकार व भगवान बुद्ध महात्म्य सांगतात. जरा आलिकडेच फोर्टमधील मंडळी नाटकाची मोठी नादिष्ट. स्वतंत्र नाटक मंडळ स्थापून नरेंद्र के. मोरेंच्या कलेने दलितांची कला रंगभूमिवर आणू लागले. जे. एल. तांबेचा अभागी. बा.पा. काकडेंचा 'सुधारक चोर,' मोरेश्वर तांबेची 'महाराची सून' अपशिंगकराचा 'शेतकरी-राजा,' वि.तु. जाधवाचे राजासुदास, स्वतः मोरेची दलितांची दुनिया माळवेचे रूढींचें बंधन वगैरे नाटकांची करमणूक अपूर्व होय. आणि हे पहात माणसाची नजर मागे वळली. प्रज्ञेच्या जनार्दन वाघमारेंचा 'लोक साहित्याचा नवा दृष्टिकोन' पहातच भायखळ्याहून...वृत्तपत्रीय स्फूट लेखक म. दु. ताम्हानेकर, 'बौद्ध धर्म दीक्षेचा परिचय' करूं लागले. तर हरिभाऊ पगारे बौद्ध पाठ देऊ लागले. खेतवाडीतून वसंत पाटोळे पाश्चात्य पद्धतीची इंग्लिश करमणूक मराठीतून

'आम्ही तिघे,' 'प्रेम आंधळे असतं','बायको विकणें आहे,'अशी करतात. तर परेलहून केळशीं-कर माणुसकी दाखवितात. आणि नामदेव व्हटकर–"आईशिवाय जन्मलेल्या आपराधीची वाट चुकली" ती अभिनय नट तमाशा, नभोवाणीच्या तंत्रमंत्रानें सुधारून भावगीते गात सिद्धार्थपर्यंत सुधारतात. तर भि. धो. कर्डक काव्य शाहीरीनें आधूनमधून जाणीव देतात. मांटुग्यांहून दिनेश लखमापूरकर सुधारसांचा प्याला. उदय नागपुरी रविचंद्रपुरीसह बौद्ध पाठ देतात. नायगावांतून जी. एम. आडसूळ भोरची कामगिरी व खासदार बाळासाहेब साळुंकेचा परिचय देतात. व वरळीहून भाऊसाहेब आडसूळ आचार्य अत्रेचा 'दलितांचे बाबा' समग्रपणे प्रगट करतात.

मालाडहून देवीदास पोखर्णीकर भगवान बुद्ध आणि धर्म त्याचा आदेश सांगत. बाबा-साहेबांची समग्र भाषणे दोन खंडांतून ऐकवितात. तर अलिकडे चिराग नगरांतून आण्णाभाऊ साठे हे वारणेच्या खोऱ्यातून पवित्र चित्राला इनामदाराच्या वाड्यावरुन खुळवाडीत आणतात. तिच्या पुढील महाराष्ट्राच्या व्यासपीठावर अन्य अनेक क्रांतीकारक पोवाडे गावून नव्या तमाशांतूनच अभिनव वैजयंताचे नुपूर घुमावितात पण त्याच्या फकिराची घोड दौड अशी बेफाम सुटते कीं, देशभक्त घोटाळे त्या धडकेनें मेंग्याचे लग्नच विसरुन बरबाद्या कंजाऱ्याकडून कान कापून घेतात. अशी जबर कलाकृति अंतरराष्ट्रीयपणे गाजवितात. खारहून कारंडे गुरूजी–चावटळीतून दिवा घेऊन नवी वाट सुधारत, संगीत जयबौद्ध म्हणत. राम पाठाडेच्या साह्याने, राजभोजचे चरित्र, प्रकाशांत आणतात. कुर्ल्याहून वि तु. जाधव, प्रबुद्ध आंबेडकर, सिद्धार्थ, महाराष्ट्राचा महार व भाषिक वादाची मिमांसाशिवाय राजा सुदास दाखवितात. तिथल्या सौ. विद्या निकुंभ, बौद्ध पर्णे अर्पण करून दादरच्या शकुंतलाबाई साळवेच्या मुक्तीकोन पथेवर मात करतात; याचवेळी धर्मावर चर्चा करणारी पुस्तिका, त्रिकुट, एकमित्र अभ्यासू, जिज्ञासू, आंबेडकरी ब्राह्मण, अशा नावांने किती तरी निघत बौद्धाच्या आर्थिक समस्येवर प्रकाश, भुसावळचे रा. ची. सुरवाडे व बंदसोड्याची प्रश्नावलीनें पडतो. आणि नागपूरचे के. व्ही. उमरे, सवलतीचा खिसा खुला करतात.

मुंबईच्या गर्दीतून पल्ल्याची नजर टाकल्यास पुन्हां स्मृती उजळ होतात. पुण्यांतील भोळे यांची परदेशांतील कामगिरी, रा. ह. गायकवाडाचे जाती भेदाचे उच्चाटण व राज-भोजचा लष्करी पेशा, नवलकराचे श. जा. कांबळे चरित्र, हे पाहून मन स्थिरावते व नव्या-नेच वि रा रणपिसे बौद्ध विधि दाखवि[illegible]......आनंद कौसल्यायनची भाषणे पण प्रगट करतात. आणि शंकरराव खरात. बारा बलुतेदारचे सनातन्यांत कुतूहल निर्माण करतात तर आशानंद मर्गी[illegible]थ स्वप्नांतून [illegible] शोधतात. पुढें सोलापूरला 'भिम बुद्ध भगवान की जय'

च्या काव्य लकेऱ्या निनांदतात. हैद्राबादेहून तुळशीराम कांबळे अस्पृश्यता, वसंत संमेलनादि 'वैधानिक अधिकार' प्रगट करतात. पुढें वर्ध्यास वळल्यावर दिनबंधूंचा अशोक विजय जाणून दौ. का. कांबळेचा संत चोखामेळा परीसून आंबेडकरांची साठ वर्षें स्मरत, नागपूरला मानवी मन विसावते. उसंत घेते. पुजा करते. आणि पुन्हां स्मृतीला ताण देते...ना.रा शेंडे, जे. दलितास उद्देशून उत्तेजन देवून जे. वर्तुळा बाहेर पडले. आणि तिथून काजळ्या रात्री तांबड्या दगडावर लोकसाहित्य संपदेच्या सावलीखाली, दुर्गा दर्शन घेत राहिले; ग. म. ठावरेनी शे. का. फे. च्या विरोधकांना मागे उत्तर दिले असले तरी त्या आधीच्या, कि. फा. बनसोडचा प्रदीप प्रदिप्तपणें सांप्रत प्रगट झाला आणि संत बोधीचा बौद्ध उपासक धर्म रहस्य सोनाळ-करांचे धर्म रहस्य जाणून त्याचं हृदयपालट करूं लागला. खैरकरांचा सिद्धार्थसह दुर्जन शेंडे आंबेडकर महापरी निर्वाण रहस्य दाखवूं लागले. तर रा. गो. बहिकर आंबेडकरांचे वैरी लक्षू लागले. अशा तऱ्हेनें इथें या सांप्रदायीक प्रवाहाची सांगत व्हायाची पण नाहीं. वर्ष दीड वर्ष गेले. शोकस्मृती पापणीच्या कडा सुकल्या आणि अराध्य दैवताच्याच चैत्य भूमिजवळच बौद्ध मनाच्या भावनेला साधारण तडा गेला. आणि त्या विव्हलतेचं श्वास मात्र आद्यापि ऐकूं येतात. वतन बिलाचा अर्थअनर्थ बी. सी. कांबळे तोंडून ऐकतो तोंच डी. ए. कट्टीच्या भट्टीतून रि. प. पक्षांचे घरटे कोण विसकटतो. त्याला शह म्हणून ए जी. पवार नवीन घटनापुढें आणतात. तर मिलींद हें रि. प. पक्षाला कम्युनिष्टापासून कोणी वाचविले. यांचा पंचनामाकरून अनुसूत च मिलिंद हे द्वैय लगेच दुरुस्तांच्या आंतरंगांत शिरून त्याचा परिस्फोट करतात. असें हे स्वाच्छोश्वास बंद होऊन मंगल पवित्र शांती कधि प्रदिप्त होईल चिरऐक्याचे शांतीवैभव कधी पाह्यला मिळेल या भांबवलेल्या आशानें दलित व बौद्ध मन नित्य, स्मरणीय चैत्य भूमिच्या पुलिनावरून पुन्हां पुन्हां विंहगमावलोकन करीत आहे !

★ ★ ★

११५३०

# बहुजन साहित्यांतील आंबेडकर संप्रदाय

ज्ञानेश्वरकालीन स्थित्यंतराच्या टणत्काराविषयीचे उद्‌गार यथार्थ आहेत. "अंजन-कांचन करवंदीच्या कांटेरी देशा" अशा मराठभोळ्या साध्यासुध्या महाराष्ट्राची सोज्वळ मराठी भाषा इ. स. ६०० पासून अद्यापपावेतों अनेक राजकीय, सामाजिक संस्काराच्या संक्रमणांतून निभावून आली आहे व हीनदीन पददलितांचे तोंडीं रुळली आहे. ज्ञानेश्वरानंतरचा संतांचा काळ, मग पंतांचा काळ तद्‌नंतर पंडितांचा आणि शाहिरांचा काळ असे विभाग पडतात. आधुनिक कवीपंचकापुढें रविकिरण मंडळादि अभिनव लेण्यांनीं युक्त तिचें गद्यपद्यादि अभिनव स्वरूपाचें विपुल वाङ्मयीन मांगल्य सांप्रत ओसंडत आहे.

साहित्यांत तथा वाङ्मयांत अन्य अनेक प्रकारचीं दालनें दिसतात. उदा०—चरित्र खंड, ऐतिहासिक रुमाल, कुलवृत्तांत, वादविवेचन माला, काव्य, कथा, कादंबरी, स्फुट-साहित्य, काव्य विभाग वगैरे आपण पाहतों. त्याच प्रकारचें पण केवळ पददलितांकरितां, मानवी आदर्शाकरितां, बहुतांशीं अस्पृश्याकरितां जें वाङ्मय निर्माण झालें त्याचा थोडक्यांत ओनामा लक्षांत घेतला पाहिजे.

प्राचीन लेखक, कवि, संत, पंत, पंडितादि, शाहीरांनी पददलिताखातर सौजन्य ,भूतदया या दृष्टीनच भाषा राबाविली. ती पुसटशी, अस्पष्टशी, जाणवली. पण इंग्रज आमदानीच्या मध्यान्हीला "मराठी तेवबा भाला जाहलीं नांगरी फाळ" या काळांतच लेखणीचे आधिपत्य मात्र लोकचारांत प्रभावी झालें. याचवेळी मराठी साहित्यांतील अग्रणीत लोकहितवादीनी पददलितांच्या मुकवाचेचा सुरुंग ठासला. शतपत्रांतून त्यांचे जे बार उडाले त्यांचा परिणाम प्रभावी झाला नाहीं; पण याच मूकबारांच्या धूमधडक्यानें धीट झालेला गोरगरीबांचा कैवारी महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या आसूडाच्या फटक्यांनी सोंगढोंगादि गुलामगिरीच्या बेड्या धाडकन् तोडून दाखविल्या व त्याचे जातिभेदाचे तुकडे साक्षीदार अमेरिकेस नजर केलें. मराठीचे शिवाजी म्हणविणाऱ्या चिपळूनकरांनी त्यांची घोर निंदा केली. पण तसल्याहि सनातन कर्मठ काळांत या सत्यशोधक बहाद्दरानें आपली लेखणी अशी कांहीं चालविली कीं, तिच्या स्फूर्तीनें विठ्ठलराव शिंदेसारख्या मानीं मर्द मराठ्याने महत्प्रयासानें "भारतीय अस्पृश्याचा प्रश्न" धाडसानै पुढें आणला. त्यालाच साद म्हणून कीं काय सुज्ञ ब्राम्हणांतील श्री. बापूसाहेब माटे यांनी "अस्पृश्याचा प्रश्न" संशोधनपूर्ण उघडा करून पुढें "माणुसकीच्या गाहिवरानें" त्यांनी "उपेक्षितांचें अंतरंग" साक्षात उघडे केलें व अशा मागासलेल्यांचा "गांवगाडा" त्रि. ना. अत्रेंनी धाडसानें बेशीकर टांगला. इतकेच नव्हे तर दिनकरराव जवळकरांनी राजाराम महाराज व महात्मा फुल्यांचे चरित्र सांगून याचि देहि याची डोळा "देशाचें दुश्मन" कोण हा गक्ष प्रश्न उभा केला.

[ त्याचप्रमाणें या अनुषंगानें श्री. नलावडे व लाहिगुडे यांचे सत्यशोधकाबद्दलचे वाङ्मय तर श्री. हर्षे यांचे चार्वाक संबंधीचे विचार शिवाय आंबेडकर पुरस्कृत वा. गो. आपटे यांचे बौद्ध पर्व ह्या उल्लेखनीय बाबी होत. ]

यानंतर बऱ्याच राजकीय, सामाजिक संघर्षात हे प्रश्न किरकोळ लेखणीनें हाताळले तरी महात्मा गांधीचें लक्षवेधण्याबाबत पुढारपणाचे होते ते तितकेच खरें. " अस्पृश्यता निवारण " यावर देवगिरीकर पटवर्धनांनी सहकार दिला. याच उद्धाराचे कामी आधुनिक महाराष्ट्राचे संत साने गुरुजी यांनी पांचवा वेद " कुरला " पुढें मांडला. चित्रशाळेनें हरिजन संतांचे दर्शन दिले. त्यासह पुरंदरे यांनी " अस्पृश्यता आणि देवालयाची पताका " हाती धरली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्य सुरुवातीला वरील स्पृश्यांतर्गत वाङ्मयीन कार्य दलित संघर्षात्मकच होते. धर्मांतराचा प्रश्न निघाला तेंव्हां धर्म, समर्थनार्थ पं . सातवळेकरकृत "स्पर्शा-स्पर्श " मराठी स्पर्श करूं लागला व अण्णासाहेब किर्लोस्कर अस्पृश्यता रूःक्कूठार ' घेऊन आंबेडकरांची मनधरणी करूं लागले तर ग. रा. परांजपे काशीच्या शंकराचार्यांशी 'लपंडाव' खेळूं लागले. शेवटीं तर बॅ. सावरकरांनीं ' जातिभेदोच्छेदक ' प्रबंध मांडून मोपल्यांच्या बंडांतून, सन्यस्त खंड नाटकांतून या कामीं विस्तृत चर्चा उभी केली.

रशियाच्या दुर्बिणीतून मोडकांनीं अस्पृश्यांची मूर्ति दाखवून मुल्कराज आनंदानी त्यांचे गांधीप्रणीत स्वरूप दाखविले, तर महादेव शास्त्रींनीं दलित संत ' नंदनार ' प्रगट केला. नाट-कांच्या चलतीमध्यें मामा वरेरकरांच्या तुरुंगाचे दारांत गोखलेंचा " महारवाडा" तसेंच अत्रेकृत "वंदेमातरम्" सोबत पारसमिसाच्या "दख्खनच्या दिव्या"ला प्रबोधनकारांच्या "खऱ्या ब्राह्म-णाने" शह दिला. आणि लालित्याला बहर आला असतांना श्री. म. माटेनीं घातलेल्या पायावर श्री. व्यंकटेश माडगुळकरांनी " पुढचे पाऊल "ने कळस चढविला. कादंबरी प्रो. लागूचे. " बहिष्कार", वी. सी. गुर्जर "महाराची पोरं" देशपांडेच्या बंधनाच्या पलिकडे गेली. नाहींत खांडेकरांचो दोन मनें, माडखोलकरांचे चंदनवाडींतून, हडपांचा रूढीचा वणवा बघु लागला पण पुढें कुमुदिनी प्रभावळकरांच्या निर्माल्यांतील कळीसह विभावरी शिरूरकर या बाईनें नतद्रष्ट परिस्थिति "बळी" दिली. कथासंग्रहांत माटेनंतर माडगुळकरांएवढा दलित कथालेखक नाहींत. एवढी विपुलता त्यांनीं " माणदेशी माणसाला" गांवकडच्या गोष्टी सांगत ' हस्ताच्या पाऊसात ' काळ्या आईचे स्वरूप दाखवून "बनगरवाडी'चे दर्शन देतांना एकनाथ सीताराम म्हणतात पुढचें पाऊल ऊंबरठ्यावर ठेवून जांभळाचे दिवस दाखविले. हाडाचा चिकट तसा पिंडाचा बलदंड लेखक प्रबोधनकार ठाकरे इतिहासांतून दाखवीत त्यांनीं कोदंडाच्या टणत्कारांनीं ग्रामण्याचा हिंदू धर्माचे दिव्य शनि महात्म्यापुढें टाकलेले पोर ठेवून खरा ब्राह्मण प्रकट केला व जुन्या

आठवणी सांगत रंगो बापूजीच्या मानस दैवत इतिहासाच्या मंथनांतून प्रभावीपणे बाहेर काढले.

ज्ञानकोशकार केतकरांच्या ब्राम्हण कन्येला कोल्हटकरांचा ज्ञामसुंदर भुरळ घालीत होता तर साहित्यसम्राट न. चिं. केळकरांच्या बलिदानांतून वा. गो. आपट्यांचे 'बौद्धपर्व' पुढे आले म्हणूत शंकरराव देव 'केवळ बुद्धासाठी' लिहिते झाले. यादवेंद्र शर्मांचे रम्य मनोहारी, देखणे असें पुनर्मिलन, चिटणीसांची युगयात्रा पार करते झाले; आणि शेवटी प्रो. शेंबवणेकरांचे यथार्थ बुद्धदर्शन रद्दी ठरवून कौसंबीचे बौद्ध वाङ्मय तरारले, फुलारलें असतांना ललित लेखकांपैकी काशीनाथ पोतदार, दुर्गा भागवत, अ. रा. कुलकर्णीं, अहिल्या सामंत, चिंतोपंत गोसावी, गोपीनाथ तळवळकर, वसंत वापट, मा.कृ. शिंदे वगैरेंची लेखणीकुंचली सिद्धार्थ गौतमबुद्धाची दैदिप्यमान चिरकृति चितारूं लागली. हे सर्व उभा मराठी महाराष्ट्र अवलोकन करीत आहे. यावरून घोरपडे आदि श्री. मुळेकर पाटील, मंगुडकरांचे आंबेडकर चरित्र व अंत्य आदर्श ललित साहित्य दलित तथा अस्पृश्यांच्या चळवळीची दखल घेत पावलें टाकतों, हेंहि समाधान होय. याशिवाय कथा कादंबरीच्या क्षेत्रांत पु. भा. भावे, अरविंद गोखले, म. भा. भोसले, रणजित देसाई, महादेवशास्त्री जोशी, मधु मंगेश कर्णिक, वसंत बापट, रघुवीर सामंत, शंकर पाटील, ना. ह. आपटे, वि. वा. हडप वगैरे कांहीं सहृदय कथालेखकांच्या विपुल अशा दलित जिव्हाळ्याच्या कथा एवढ्या आहेत कीं, त्यांचा एक विस्तृतसा लेख होईल आणि यथाकाळ हेहि समालोचन देणें उचित होय !

या क्षेत्रासंबंधानें नाटकाच्या दृष्टीनें आबासाहेब आचरेकर, मुरारी शिवलकर, गं. वि. गोखले, व्ही. एस. कावले, माधव तेंडुलकर वसंत दूधवडकर, वसंत बापट वगैरेंची कामगिरी महशूर होय. एकूण आंबेडकर संस्कृतीचा स्वतंत्रपणा मराठींत जाणवला नसता तर वरील दलितला लिखाचा नूर एवढा विपुल तर दिसला नसताच पण तो मात्र वेगळा आणि आगळा दिसला असता.

प्रत्येक मनुष्य स्वभावतः कवीच असतो 'Every word was once a poem इमर्सन म्हणतात. त्याप्रमाणे हरेकांचे हरेक शब्द वादलुब्ध जाणवलें कीं तें काव्य म्हणून गणलें जातें व याची गणना करण्यास कोण शिल्लक राहतो ? अर्थात कोणीच नाहीं; आणि मग नाइलाजाने वरील धांवाधांव करावी लागते.

मराठी साहित्यांत व दलित कलेत काव्याला मोठें महत्व आहे. " वाक्यम् रसात्मक काव्यम् " अशी जरी ख्यातनाम व्याख्या असली तरी " कविता म्हणजे जीवितावरील टीका " असें मॅथ्यू अर्नॅल्ड म्हणतो यावरूनच मराठी कवि परंपरा । खंडन पडली तिला जरा । उणीव रसिकांचीहि वसे । काव्य मराठी विकासतसे ।। असा अभिमान दाखविला जातो.

अशा या जीवनाचे प्रतिबिंब असलेल्या मराठी कवितेचे रसग्रहण करणे जरूर आहे तिचेविषयीं मत प्रतिपादणें जरा कठीणच आहे; कारण केशवसूत धमकी देतात कीं—'अशी

असावी कविता फिरून । तशी वसावी कविता म्हणून । सांगावया कोण तुम्ही कविला । आहांत मोठे पुसतों तुम्हांला ॥ आणि तेच पुढें कवि शब्दार्थ लोळविणे । आस्माद गान नव्हे तें गान-ते गान चिध्यादान ॥ यावरून जातिवंत कवि व त्याची प्रतिभा याविषयी त्यांचा केवढा अभिमान अत्युच्च सही सलामत बाहेर पडून स्वैर संचार करीत. मधुगंध दरवळत, विहरत आहे आणि म्हणून कल्पना येते कीं मराठी कविता महाराष्ट्राएवढी व्यापक आहे.

तेव्हां या मराठी कवितेचा पान्हा, प्रेमासाठी कृष्णा 'गोदेच्या' परीने प्रियकरांकडे धांव घेत आहे. होनाजीं 'जगीं सांगतात प्रीत पतंगाची खरी । झडप घालूनी देती प्राण दीपका वरी ।' यावर ताण गडकऱ्यांनी करून "निष्प्रेम चिरंजीवन हें जगीं दगडालाहि मिळतें धिक्‌त्या। क्षण एक पुरे प्रेमाचा वर्षाव पडो मरणाचा ॥ मग पुढें । तो योग, खरा उद्धार योग प्रीतीचा रोग लागला ज्याला । लाभतें मरणही त्याला हें असें ।" इथपर्यंत प्रतिभा गेल्यावर, शिगेला पोंहचली. यावरून साजिंद्या—बाजिंद्याचे पोशिंदे हळवे कवि आपली प्रतिभा या सोप-संस्कारार्थ किती झिजवंत आहेत याची कल्पनाच केलेली बरी.

वरील थोरामोठ्यापेक्षां सर्वसामान्याहून किरकोळ कविबुवाकडून विशेष, आगळ मनाला निर्भेळ आनंद देणारे काव्य आढळणें कठीण झाले आहे. व्यवहारांत वावरतांना जिकडे पाहावे तिकडे जे आढळते त्याला मर्यादा भयतेन आवरून पळ काढण्याची पाळी येते व डोक्याला सूंट लावून पडावेसे वाटते. जिकडे पहावे तिकडे कवीच कवी, नाना गुणविशेषगांनी नानास्थळीं नाना पेशावेशांनी वावरणारे कवी अडाण्यांच्या शिवीसारखे विपुल झालेत. याचं कौतुकंच मानावं कां ? विषाद, हेच कळत नाही.

हीं मंदिरें खुलतात चांगली । तीं माझ्या वडीलांनीच न काय बांधली ॥ असें म्हणून मराठी नवकाव्याचे शिल्पकार श्री. केशवसुतांनी अशा विषयांवर कांही कविता लिहिल्या, त्यांच्या "तुतारीनें टिळकांचे रणशिंग गडकऱ्यांच्या दसऱ्यांत फुंकून बालकवीचा धर्मवार जो उभा केला." एवढा जहालपणा बजावतात. बाकीचे किरकोळ मराठी काव्य अकल्पनिससें विस्कटले उधळलेले आहे.

तेव्हां सुसंस्कृतीबद्ध मराठी कवितेचा पान्हा प्रतिमेतील जीवनरस अस्पृश्यतेबद्दल कितपत पाझरतो. हा प्रस्तुतचा महत्वाचा विषय इथे पाहूं जातां वरील म्हणणे एकदोन थेंबापलीकडे काव्यगंगा दलिताला अस्पृश्य आहे असेच आढळून येईल. बहुतेकांच्या संयमी काव्यांतून कुठे असुया, कुठे वैताग, उद्वेग तर कारुण्य, नाहीपेक्षां सहानुभूति असा प्रकार आढळतो.

पडली छाया मनुजाची जर । विटाळ होतो तर मनुजाला । व्हावे स्नानची सचैल त्याला । काय म्हणावे या मूर्खाला । नरेच केला हीन किती नर—इति केशवसुत. तर त्यांचे

चेले गडकरी म्हणतात—रडत बैसले महार मांग । दीनपणाला गर्वें छळतें । अज्ञानाला भिवूनी वळतें । त्यावर ध्या या नचं जे वळतें । उंचत्वा त्या लावा आग ॥ अशा प्रकारची तीव्र प्रबोधनें देतात.

या व्यतिरिक्त इतर उद्बोधनें आढळतात पैकी रे. टिळक ब्राम्हण किंवा महार या कवितेंत म्हणतात "होईन निचाहून नीच । करीन अवध्याना उंच । ते ब्राम्हण मग महार मी । कोण गणी मग मला कमी ॥ " एवढा विश्वासी दिलासा देतात. कवि मनमोहन दलितांवर खंडकाव्य करून सहानुभूती दाखवतात.

यशवंत अंत्यजास उपेक्षाजनक इशारा देतात, तर ग. ल. ठोकळ मांग स्त्रीच्या जीवनाचे दुःख उकलतात. उघडा उघड दार विठला म्हणून शांताबाई शेळके भक्तीच्या मसलतीची सलगी करतात, तर ग. दि. माडगूळकर सिनेमांतून भाविक पंढरीनाथ महार दाखवितात. शिवाय श्री. पांडुरंग दडकर "महाराचा पोर" ला अश्रूपात हा कशास करसी काढून रडसी गळा म्हणून विचारपूस करतात व त्यांचे हृद्गत समजावून घेतात आणि कीर्तनकार स्वामी आफळे "वळख आम्हाला वळख दयाळी आम्ही तुझी लेंकरें" अशी विनवणी करतात. माधव हरी साळवे अस्पृश्यता आणि धर्म यांवर ओव्या गातात. अशा प्रकारे ह्या कवींनी थोडेतरी या पान्ह्याचे खेदबिंदू अस्पृश्यतेवर टाकण्याचा प्रयत्न केला आहे. अगदी खोलांत शिरल्यास अन्य शेकडो सांपडतीलच !

याशिवाय कित्येक मासिकें, पुस्तकें, साप्ताहिकें यांतून स्पृश्यांतर्गत दलित साहित्याची किरकोळ अशी अमाप भरती आहे, यांत शंका नाहीं.

अस्पृश्याचा समाजांतील थोरामोठ्या कवि लेखकादि साहित्यकारानी जे कांहीं मराठींत अस्पृश्यांच्या बाबतींत जिव्हाळ्याचे अल्पसें साहित्य निर्माण केलें त्यांचा ओनामा मराठी शारदेच्या दरबारांत एकमेव अभिनव लेणें म्हणूनच म्हणावे लागेल !

* * *

# स्वजनोद्धारास्तव बौद्धिक संघर्ष

प्रथम महाराष्ट्रांत मराठी भाषा इ. स. ४ थ्या व ५ व्या शतकांपासून उदय पावली. ह्या भाषेचे आजपर्यंतचे सर्व वाङ्मय व साहित्य ब्राह्मणांचे, अब्राह्मणांचे मुळींच नाहीं. परंतु या दीडहजार वर्षांच्या कालप्रवाहांत अब्राह्मणांचा याबाबत **कसा दारकोंड** होता, कशी अडवणूक होती. याचे स्थूल चित्र तारतम्यानें जरा मागें जाऊन पाहिल्यास मुळभाषा संस्कृत व तिच्यापासून अन्य अनेक प्राकृत भाषा झाल्या. त्यापैकीच महाराष्ट्रीय म्हणजे मराठीची प्राकृत आई व संस्कृत ही आजी असे चिंतामणराव वैद्य म्हणतात.

मराठींत तत्सम म्हणजे संस्कृतप्रमाणे तसेच्या तसे **तद्भव** म्हणजें तत्कालीन उद्भवलेलें असे शब्द आलें व त्यानाच निरनिराळ्या, देशी भाषा म्हणत. शिवाय मराठींत असे कांहीं शब्द आहेत कीं तें तत्सम **तदभव, यवनी** वगैरे नसून कोठून उत्पन्न झाले हे कांहींना सांगताच येत नाहीं. ते मुळचेच तेथल्या पूर्वीच्या महाराष्ट्रांत वस्ती करून राहिलेल्या लोकांचे असावेत. आणि ते मराठीत दृढमूल झाले असावेत. अशा शब्दांना देशी शब्द म्हणतात. ( मराठी साहित्य मोनें. )

महार हे अतिप्राचीन पुरातन कालचे. अस्सल देशी लोक या संबंधानें शंका नको. महारांची बोली शुद्ध, व **असंकिर्ण** देशी समजावी जे आमच्या भाषेचे रुप आज मितसि त्यांनी राखून ठेविले आहे. तें आमच्या भाषेचे आजमितीचे अतिशय शुद्ध रुप समजावे.

प्राकृत या शब्दांचा अर्थ प्रकृतीपासून आलेले असा नसून ' पाअड म्हणजे प्रकट किंवा ऊघड असा आहे. अर्थात प्राकृत भाषा ही सामान्य जनांची म्हणजे सर्वांना सहज समजणारांची होय ( राजाराम शस्त्री भागवत. ) महाराष्ट्र हा शब्द व मराठी भाषा या दोन गोष्टी महार व रट्ठ वंशाच्या मिलाफानें झालेल्या आहेत. ( केतकर )

वरील उदाहरणे अशा रोखाने घेतलीत कीं संस्कृत येणाऱ्यांनाच पंडित विद्वान म्हणून शेखी मिरविणारा काळ गेला व आज देशी धाटी किंवा सातारी पद्धतीची ललित लेखन भाषा आणणारा काळ प्रचलित रुढ झाला व हे होतांना या अस्सल मराठीचे जनकत्व कांहीं लोक मराठ्यांकडे देतात. तर कांहीं महारांकडे तर कांहीं चांभाराकडे व कांहीं मांगाकडें देतात. अर्थात हे जनकत्व सामान्याकडे मुळाकडे येण्याची आज कबूली मिळते. यावरुन मूळ

बोलीभाषा, रूढभाषा, अब्राह्मणांची आज प्रांतानिहाय, लोककथा लोकगाणी जी समाज माणसाच्या दिल दिसरांत जपून आहेत ती फुरसदीच्या वेळेला जर रसाळवाणींत खुली झाल्यावर जी तंद्री लागते, जो बोध सांपडतो, शब्द संकेत, कल्पना हेतू व मुत्सद्दी युक्तिवाद आणि सारभूत भावार्थ जो सर्व ठिकाणच्या निरनिराळ्या भूमिकेचा पण एकाच सारांशाचा दिसतो. आणि त्या सारांशाचे व बुद्धकालीन जातक कथांचे तौलनिक स्वरूप एकच दिसून येते. तेव्हां लोक कलात्मक दंत कथा, कल्पकथा, लोकगीतांनी वाच्य तथा वाङ्मय म्हणून बहुजन समाजांत कालामानानूरुप अस्सलांत नक्कल शिरून मराठी भाषा इ. स. ४०० ते १२ व्या शतकांपर्यंत सर्व तऱ्हेच्या लोकांत फक्त बोली भाषा म्हणून रूढ होती. नंतरपुढे ग्रंथबद्ध-भाषा जशी रुढ झाली तरी पद्यालंकार युक्त तोंडपाठी वैदिक, वैष्णव भागवती व महानुभवी वाङ्मय यावेळेपर्यंत गुरुशिष्य परंपरेनें तोंडपाठी रुढ होतें. हे तितकेच खरे व याचे **अध्वर्यु** ब्राह्मण होते. फक्त व्यवहारी बोली भाषा मात्र सर्वतोमुखीं सर्रास रुढ होती.

संस्कृत भाषेचे मानी। विद्येचे धनी। एकदा त्यांनी ज्ञानाच्या मक्तेदारांनी कट पहा केला। मानून हिन मराठीला। संस्कृतचा पगडा बसविला। प्रगतीचा मार्ग रोखीला। महाराष्ट्र दिन जाहला। अंतरला माय बोलीला। इतिहास पुराणें, वेद दिसेना त्याला। घनघोर महा-राष्ट्राची गर्जना झाली? संस्कृत भाषेची भिंत त्यांनी फोडली। ती माय मराठी बोली बाहेर काढली स्वैर सोडली। अज्ञान दिन दलितांना भागवतगीता त्यांनी वदविली। जी जी... अण्णाभाऊ साठे.

संस्कृतीची व भाषेची भिंत फोडण्याचे प्रचंड कार्य ज्ञानेश्वरांनी केले. **तेणें खालच्या** वर्गाची जागृति झाली. असे समर्थन ऐकायला मिळते. परंतु ते चूक असून केवळ गेलेले ब्राह्मणत्व सिद्ध करण्याच्या अट्टाहासापोटी हा प्रयत्न होता. व या द्वारें ज्ञान गुप्त होते. तें प्रगट झाल्यानें जो समाज सुज्ञ झाला तो भागवत संप्रदायांत आठरापगड जातींचा. संत प्रति-निधींनीं महाराष्ट्र व्याप्त भारला गेला कारण याचवेळीं हेमाडपंताने मोडीलिपी आणून विशिष्ठ देवळे बांधून चतुर्वर्ग चिंतामणीद्वारें वर्षाचे दोन हजार विधींचें स्तोम समाज माथीं मारलें. तेणे वरचा व खालचा वर्ग मोक्षमुक्ति अपेक्षेनें विधीमध्यें व भक्तीमध्यें चूर झाला. ही अनुभवसिद्ध स्थिति पहाणारें तत्कालीन संत चोखोबा, बंका, कर्ममेळा, सोयराबाई, निर्मळाबाई, भागुबाई म्हारीण, रोहिदास, सेना न्हावी, सजन कसाई, गोराकुंभार, सावतामाळी हे अब्राह्मण संत या अलभ्य नादाला नादावले असतील असे संभवणीय नाहीं. तसे असते तर इतराच्या तोंडीची त्यांची भाषा भक्ति, आचरण जे तत्कालीन लेखकांनी त्यांच्याच वाच्या वाङ्मयाद्वारें दाखविले. त्याचे समाजाने त्यांचा अनन्वित छळ केला असतां काय? त्यावेळी त्यांनीं त्यांना समरस करून कां घेतले नाहीं? गांव कुसांत चोखोबास चिणून मारण्याची कांगांवखोर कठोर शिक्षा कां देण्यांत आली? तर संभवनीय आहे. चोखोबानें तत्कालीन वस्तुस्थिती जाणून बौद्धिक

अनुक्रम
क्रमांक ........ वि: ........
नों: दि: ........ ठाणे. स



गुणानें कांहीं समाज माणूस जिंकता यावें, बंड करावें, झगडावें, अशी वृत्ति ठेवली असावी पण या थोर संताचे प्रयत्न या प्रचंड पंढरपूरी लाकड कोटांत अपुरे पडले व हताशपणें बलिदान देणें भाग पडलें. त्यांची बुद्धिजीवि भावी पिढी पण सतत झगडत राहिली असावी. पण ती चोखोबाच्या उदाहरणानें निष्प्रभ झाली असावी. चोखोबाचे फक्त भक्तीपर अभंग सांपडतात. चोखा देवाकडेच फक्त हट्ट घेतों, भांडतो. तो फक्त एकट्यासाठींच, मग या सर्व वैष्णवांत देवानें मान्य केलेला माणूस कां खपला नाहीं ? चोखोबाला त्या काळचा महार समाज दिसला नाहीं, चतुवर्ग चिंतामणीचा प्रभाव जाणवला नाहीं. मन, भावना, जिज्ञासा, प्रतिभा असल्याशिवाय कां अभंग प्रसवले. मग त्या प्रश्नेला असमंतांतील वस्तुस्थिति जाणवली नाहीं असें कसें म्हणतां येईल. तात्पर्य चोखोबा शिकार झाले व त्याचें नकली साहित्य स्मारक अवशेषी राहिले. हा विषयच मोठा चिंतनीय तसा विस्तृत संशोधनाचा आहे.

वैष्णवपंथाच्या समकालीन महानुभवी यांनीं हिंदू धर्मातील भेदजाति वगैरे विरुद्ध उचल खाल्ली व पद्धतशीर मराठींत रचना सुरू केली. तेणेंकरून बहुजन समाज इकडे आकृष्ट झाला. विदर्भ, मराठवाडा, नागपूर भाग तर या पंथानें पुरा व्यापला व कालपरवापर्यंतचे या भागांतील अस्पृश्य या पंथाभिमानाचे होते. इतकेंच नव्हे तर बहुतेक खेड्यातील महारांच्या घरीं महानुभावी ग्रंथाचीं बाडे असत. असें अर्वाचीन मराठी या ग्रंथांत म्हटलं आहे.

अशा या महानुभावी पंथाचा बिमोड करण्याचा भावार्थ दिपिकेद्वारें सूड प्रयत्न ज्ञानेश्वरानें केला. व या पंथाच्या चक्रधराच्या मताचें खंडन करून हिंदुधर्मातील वेद वेदांगें, पुनर्जन्म, अवतार कर्मवाद, मायावाद, चातुर्वर्ण जातिभेद इत्यादि भावनांबद्दल जनतेंत पुन्हा निष्ठा जागृत केली अर्थात् हा झगडा क्षुल्लक असेल काय ?

त्यावेळीं भारतव्याप्त मुसलमानी आक्रमणें होतीं. गुजराथेंतील हरपाळ तथा चक्रधरानें महाराष्ट्रांत महानुभाव पंथ रूढ केला त्यांच्या मृत्यूनंतरच कांहीं वर्षांनीं त्याचे गुजराथेंतील सिद्धराजकालीन महात्मा मायोमहाराचे पुण्य-पराक्रमाचे निश्रेय पाहून शूद्र, मुसलमान खुस्रूखानानें दिल्लीमध्यें न झेपेलसे परीवर्तन केलें तें म्हणजे महारानें तुघलखांच्या काळांत पांच वर्षे दिल्लीची सुलतानी गाजवून जात काशीचे हित साधण्याचा प्रयत्न केला. असो. ही जी प्रवृत्ति तिकडील लोकांत तिचे प्रतिक मायोखुस्रूखान व बौद्ध, जैन, मतांतरांतून हिंदु मुसलमानाविरुद्ध समता प्रवृत्तीची लाट घेऊन महानुभाव रूपानें इकडे आला. तर तिला हटविणारा व हिंदुत्व कायम राखून देवत्व टिकवून केवळ समाजसुधारणा व वैष्णवपंथाचे रूप उजळपणें टिकविण्याचा प्रयत्न एकनाथानें केला. संस्कृतवाणी देवें केली । प्राकृत काय चोरापासूनी आली । असो या अभिमान भुली । वृथा बोली काय काज । म्हणणाऱ्यांनीं गाढवाला पाणी पाजले, महाराचे पोर कडेवर

घेतलें. अनेक भारुडांतून जातीव्यास संस्कृति व्यक्त केली व शुद्ध ज्ञानेश्वरी तयार करून वारकरी संप्रदायी वज्रलेप केला. मागील सर्व यात दडून गेले असा तर्क अनुमानाने केल्यास वावगा ठरेल काय?

पुढें दामाजीचा काळ मलीकंबरची बिबी चुकली ती कामगिरी अपूर्व शौर्यानें पार पाडणाऱ्या अमृतनाकानें या शौर्यानें बक्षीस म्हणून बावन हक्काची मागणी केली. हे वैचारिक त्यागाच तीव्र लोकदैन्याच्या औचित्यपूर्ण सेवेचे प्रतीक नव्हे काय? हिच बावन हक्काची सनद पुढे दुर्गादेवी दुष्काळांत पक्की केली. त्यावेळचीं दंतकथा जी प्रचलित आहे, "झाला महार पंढरीनाथ" हें जें रूढ आहे त्याचे नवल वाटतें. दुष्काळांत दामाजीनें कोठार खुलें केलें तो काळ बादशहाचा. त्याचे नोकर सर्व मुसलमान व मागास हिंदू, अधिकारी मात्र बडे लोक तेव्हां मधल्या हिंदूतील प्रजेला तीव्र झळ जाणवली. त्याची दया या ब्राह्मणाने दाखविली. पण त्याचे परिणाम घोर जाणवताच त्यांना देव आठवणे साहजिकच परंतु भूतदयाळू कोणा एका व्यक्तीनें स्वतःचे धन या महान कृत्यांच्या फेडीस्तत गोरगरिबांच्या पैपैची मदत गोळा करून जो निधी जमवला. तो प्रजा निधि बादशहाला देऊन हे प्रजादान स्वीकारा व ब्राह्मण मुक्त करा. नाहीपेक्षा भडकलेल्या प्रजेवर राज्य करणें मुश्किल होईल. अशी वकिली युक्ति एक सत्कृत्याचे लोक सहाय्यानें पारणे फेडणारा महान् समाजवादी विठू महार त्याच्या सत्वृत्तीचे कौतुक देवाचे नांवें टाकून त्याचे अस्तित्वच ऊध्वस्त केले असल्यास नवल काय? समाजवादी अर्थशास्त्राची ही मूळ खूण इथेच नष्ट झाली.

ज्ञानदेव रचला पाया। तुका झालासे कळस ॥ धृ ॥ तुकावाणी शुद्र याचे हाल भर शिव शाहित सर्वश्रुत आहेत त्याच्या वाङ्मय अभंग गाथेच्या अस्सल नक्कलविषयीं तर एवढा किस काढला जातो कीं शेवटीं तुकाराम एक कां दोने हे वाद वाढलेत. तुकारामाचे ग्रंथ जे इंद्रायणींत बुडाले ते जे तरले त्याऐवजी त्याच्याच टाळकऱ्यांनीं जे मुखोद्गत् केले. लेखनकलेची साधने पुरेशी नसून ठेवण्याची व्यवस्था पण नसे म्हणून पूर्वीचे सर्व कांहीं परंपरागत पाठांतरीतच असे आणि त्याचे पाठांतर स्मृतीवर कालमानानुसार अन्य संस्कार होऊन मूळचे विचारधन वेगळ्या स्वरुपांत पुढें दिसूं लागल्यास नवल ते काय? तुकाराम आजच्या काळांत असते तर त्यांच्या प्रत्येक अभंगाला नोबल प्राईझ द्यावे लागले असते. तुकाराम महाराष्ट्राचा शेक्स्पिअर होता वगैरे दृष्टीनें त्याचे महात्म्य वर्णिले जाते तें केवळ बुडालेल्या अभंगानंतरच्या बाकी आज प्राप्त असलेल्या अभंगावरूनच मग जें बुडालें असेल, दडलें. पडलें तें जें अस्सल असेल तें किती मोलाचे असेल. बाराव्या शतकांत मराठी भाषा ग्रंथबद्ध झाली तरी ती ब्राह्मणापुरती व म्हणून तुकाव्यतिरिक्त इतर अब्राह्मणांतील संताची वस्तुस्थिति विपर्यस्त करण्यास संधी होती. पण

शिवकाळांत शूद्र ठरलेल्या क्षत्रियांच्या स्वतंत्र राज्यांत शिवाजी लिहित होते, तुकाराम लिहित होते तेथें इथें मात्र मात्रा चालविणें अशक्य तरीहि युक्तिवादाचा कळस करून अस्सल तुका नष्ट करून नक्कल तुका कळसावर बसविला असल्यास नवल ते काय ?

सतराव्या शतकांत दारव्हाजवळ अंजनी येथें मालक्या महार साधु होता. त्यास कान्होजी भोसलेने सतविल्याचा उल्लेख आढळतो. तर अठराव्या शतकाअखेर म्हार माहात्म्य ग्रंथ लिहून ठेवणारा नीराकांठचा बालकदास तर प्रकर्षानें आपली प्रतिभा प्रगट करतात.

असो. महाराष्ट्राबाहेर मराठी रूढ होण्याच्या कालापर्यंत इतरत्र म्हणजे बौद्धकालीन शूद्र भिक्षु सोपका तर रामायणांतील शंभूकाशिवाय रामपूरमचा कुरलकर्ता तिरुवल्लुवर तर नेल्लोरचा नंदनार, उत्तरेकडचा रविदास, कामठीचें हरदास शिवाय कबीर वगैरेंची बौद्धिकें आणि मूळ महाराष्ट्र बौद्धमंदिर असणारे पंढरपूर तथा कमळपूर त्या पंढरपूरच्या परिसरांतील ही संतकालीन प्रभावळ व त्यांची प्रतिभा व प्रज्ञा स्वकियास्तव बंड करणारी असलीच पाहिजे. पण निरक्षरता व लेखनसाधनेशिवाय रसिकत्व याविणा ते सर्व विफल झाले.

शूर मर्दाचा पोवाडा शूर मर्दानें ऐकावा असे अगीनदासानें म्हणून खास शिवाजीहस्तें ‘ शाहिरी ’ इनाम घेतलेल्या शिवराज्याची व आधीच्या मोगलाईतील संतांची परंपरा संपली आणि शाहिरी सुरू झाली. सारा मराठा देश मुसलमानी दडस, स्वातंत्र्याचा वडस तर–धर्मानें हिडीस या दोलाचल स्थितींत मानवावश्यक सर्व साधनांच्या उत्पादनांत जरी गर्क असला तरीसुद्धां अंगच्या गुणकसबानुसार मोठमोठे किल्ले, राजवाडे, बारवा, तळी, देवळे, बांधण्याच्या-कामी गवंडी, वेठी, बिगार वगैरे राक्षसी कष्टांची कामें करतच शिपाई बहादूरीची, शौर्याची कामें करत तर गनिमी चलाखी बहुरूप्याचे कसबहि दाखवत अशा जमेल त्या साधनानें प्रयत्न करत होता. उसंत फुरसत नव्हती तरीसुद्धां धर्मानें, रूढीनें या दलित समाजाला जो कमीपणा दिला त्यावर बंड करून या समाज हितास्तव जे वीरबहाद्दर या स्वराज्यांत कामास आले ते म्हणजे मल्हारबा व गोंदनाक, चिमनाक, रायनाक, राजारामाचे वेळीं नानेवाडीचे महार पाटील आणि वाकीन खेड्याचे शूर पाळेगार पेमनाक पन्यानाईक, शाहूकालीन शिदनाक नंतर भिकू राऊत मांग ऐन पेशवाईत खर्ड्याला शिदनाक, जंजिरा कोंडनाक, वसई तुकनाक, पाचाडचा रायनाक वगैरे वीरांची कर्तबगारी स्वतःपुरती नव्हती; संकुचित नव्हती; विशिष्ट हेतूची विशाल दृष्टीची होती. पण काळांत हे जसे गडप झाले तसेच दलित शाहीर ही यांना साथ देत नष्ट झाले.

छंदिष्ट पळपुटा रावबाजीचा काळ जरी दरबारी आश्रयानें पहिला तमासगीर म्हणून रामजोशी ठरला. पण पुढें या रावबाजीच्या काळीं पानीपतला सोळा लाख बांगडी फुटल्यामुळें

या देशांत जी बेबंदशाही माजली; नीतिमत्ता ढासळली आणि आठरापगड जातींच्या तमासगिरांची अमाप अशी बेताल उत्पत्ति वाढली त्यांत सरदार जहागीरदार आदी मान्याची तालदार, मालदार मंडळी पूरती झिंगली. खालच्या वर्गानें परिस्थितीशीं टक्कर दिली व याचा फायदा मात्र परसत्तेपूढें आचके देत स्वराज्य मात्र लयाला गेले. राज्ययंत्र बदलले. कला आणि दलित आहे. तिथेंच स्थिरावले. इंग्रजी अदालतीत राणीच्या जाहीरनाम्यापर्यंत या देशांत १८५७ चें बंड, मोपल्यांचे बंड, ठगाचा बंदोबस्त, पेंढाऱ्यांचा धुमाकूळ, चाचेगिरी, व बेरड नाईक रामोशांची स्थळावशांत बंडे यांना ऊत आला आणि कलावंताची कला वास्तवता सोडून कल्पकतेला ताण देऊन अतिरंजिकपणें वाहू लागली. या इंग्रजी स्थिरतेचे नवनवे बदल झाले तरी बंडात खंड नाहीं; यांत सातपुड्याचे भिल्ल, गारतोंडचा सुभाना बेरड, सासवडचा शिवा रामोशी, बारामावळ हरीबा, पुरंदरचा उमाजी नाईक, वारणखोरा सत्याबा, सुतगटीचे बेरड तर माणदेशांत बाज्या बैज्या वगैरे मांग, महार रामोशी, भिल्ल लोक पोटार्थी अभिलाषानें गोऱ्यांच्या गोळीला हाळी देत नव्हते. त्यांची पण बुद्धिवादी विशिष्ट हेतूची चळवळ होती. खुद्द उमाजी नाईकाबद्दल कॅ. मॉकीन्टॉश म्हणतो. 'ऊमा व्यसनी नव्हता, दानधर्मी होता. शिवराज्याचे स्वप्न घोळत होते. असा आदर्श दरोडेखोराचा नसतो.' अर्थात बंडा–गुंडाचा मोड झाला त्यातच शाहीरी तमासगीर गारच झाला व राणीच्या जाहीरनाम्यानंतर वतनें धर्माला अभय इस्टेटीला थारा व रुढीला निवारा या गोष्टी झाल्या, इंग्रज राजवट स्थिरावली. यावेळीं दलितांचे अग्रणी लोकहितवादी, म. फुले, गोपाळा बाबा वालंगकर, गोपाळस्वामी, शि. ना. कांबळे वगैरे थोर मंडळी समाज राजकारणी बुद्धिवादी सामना देत होती. तर खालचा वर्ग या स्थिरावस्थेंतून पुन्हा गुणांची पांखरणें करू लागला. कला कॅ. मेकॉलेनें प्रजा शिकावी व सुधारावी म्हणून पुन्हा खालच्या थरातून जरी जगन्नेत्र दाखविलें; शिक्षण क्षेत्र सुरू केले. तरी एका विक्षिताच्या आग्रहाखातर भंडारी कुणबी आदी खालच्या वर्गांची पोरे शाळेंतून घरीं बसविली. याच दरम्यान धारवाडच्या महार मुलास हायस्कूलांत घ्यावे. कीं नाहीं. याची विचारणा पार्लमेंटांत झाली अशी शैक्षणिक नाकेबंदी झाली तरीसुद्धां धर्मांतरीत ख्रिस्ति होऊन का होईना तुकाराम नाथाजी हे वर्तमान पत्राचे संपादक नगरला झाले. तर मुसलमानांच्या तबलक तंजीमच्या चळवळीमुळें बरेच अस्पृश्य मुसलमान झाले त्या पैकीं अलिगडचे प्रोफेसर श्री. हजारी हे मुसलमान होऊन इराणला शिक्षण घेऊन पुढे आलेच अशी आमूलाग्र उलथ्यापालथ्या होऊं लागली व यैनकेन प्रकरेण खालचा वर्ग शिक्षणांत व गुणकलेंस मिळेल त्या संधीद्वारे पुढे येऊं लागला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वागत.
अनुक्रम ३९२८८ दि: १७.७.६४
क्रमांक ... नों: दि: ...

* * *

# आभार



श्री. एस्. एस्. माने



सौ. मैनाबाई माने

धम्मपदांत " सब्बदानं धम्मदानं जिनाति " म्हणजे सर्व दानांत धर्मदान श्रेष्ठ होय. तरी धर्मदान ज्ञान दानावर अवलंबून आहे. लोकहितवादी म्हणतात... जे पुस्तकें लिहितात व लोकांत शहाणे करण्यास मेहनत करतील व वर्तमानपत्रें व ग्रंथ इत्यादि उपयोगी वस्तु प्रगट करतील त्यास तुम्ही मोठे विद्वान व लोकांचे हितकर्ते समजून त्यांस सत्पात्र जाणून दान धर्म करा व त्यांचे ग्रंथ घेऊन लोकांमध्यें वाटा, दानांत पुण्य आहे असें माना. अशाच प्रकारें म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञान दानावर उपदेश देत आहेत.

महाराष्ट्र दलित साहित्य संघ म्हणजे आजची महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषद ही संस्था ज्ञान दानास बद्ध परिकर आहे. या संस्थेच्या प्रज्ञा प्रकाशनातर्फे समाज उपयोगी बरीच उत्तम पुस्तकें बाहेर पडणार आहेत, पैकीं आज-पर्यंतची प्रसिद्ध पुस्तकें सभासदांची असून त्या कामीं शंकरराव सावंत, आर. बी. कांबळे, आनंदराव पाठाणें व संघ सदस्य यांचे श्रेय विशेष होय. त्याच-प्रमाणें माने दांपत्यानें चालना दिल्यामुळें हें पुस्तक प्रकाशित होत आहे.

११५३०

श्री. एस. एस. माने (आरळे आरपळकर) हे सुविख्य प्रतिष्ठित कार्यकर्ते आहेत. आजपर्यंतच्या अनेक विविध सामाजिक चळवळींत ते आघाडीवर असतात. त्यांनीं ख्रिस्त धर्माचा खोल अभ्यास करून गेल्या दिक्षा विधि काल खंडांत बरेच दलित ख्रिस्ती बौद्ध करून घेतलेत, वरळी येथील सुप्रसिद्ध ज्ञान विकास वाचनालयाचे ते जनरल सेक्रेटरी होते. भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, प्रौढ साक्षरता प्रसार वगैरे संस्थामध्यें त्यांचा कार्यभाग प्रामुख्यानें आहे. सातारा तालुका बौद्ध विकास मंडळ व बृहन्मुंबई जलसा एकीकरण समितीचे ते उपाध्यक्ष होते. स्वत च्या जलश्याद्वारें महाराष्ट्रभर फिरले व भारतांतील बौद्ध तीर्थ क्षेत्री गेले बऱ्याच लोकनियुक्त संस्थांना यथासार मदत या उभयतांनीं केली असून साहित्य संस्थेच्या उपयोगी तर हर प्रसंगीं पडलेत. अशा सदाचरणीं दांपत्यानें या पुस्तकाचा सर्व खर्च देऊन उत्पन्नापैकीं खर्च वजा जातां बाकी उत्पन्न साहित्य परिषदेस देण्याचें ठरविले आहे. म्हणून या उभयतांचे मी आभार मानतो.

तसेंच ज्ञाते दाते या दलित–बौद्ध समाजास डॉ. आंबेडकरांच्या तत्वज्ञान अमृताचे जलपान देण्यास सहाय्यभूत होतील तर हे ज्ञानाचे उजाड रान त्वरीतच समृद्ध होऊन हा बोद्धिवृक्ष नव तेजानें तरारून सळसळल्याशिवाय राहणार नाहीं. ही अपेक्षा अस्थानीं ठरणार नाहीं असें वाटते.

या प्रकाशन कामीं विशेषतः माझे सहकारी भाऊसाहेब आडसूळ, जनार्दन वाघमारे, हणमंतराव हरी भोसले, एस. बी. खरात, यशवंतराव रा[illegible], भगिनी प्रमिला श्री. वि. रा. रणपिसे, रा. ग. पाठक, श्री. झेले, तुकाराम महादेव पेवेकर, सुधाकर दीक्षित या सर्वांचा मी आभारी आहे.

—आप्पा रणपिसे

आंबेडकरी साहित्य संप्रदायाचें

समालोचन

लौकरच प्रसिद्ध होणार

REFBK-0011530

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३१२८८ वि: १९९५
क्रमांक १३२४
नों: दि: २०।८।६९

बौद्धधर्म

व

# डॉ. आंबेडकर विषयक पुस्तकांचे

सबंध महाराष्ट्रांत एकमेव ठिकाण

## निमजीभाई अँड कंपनी बुकसेलर्स

९८।१०० नायगांव क्रासरोड,

दादर मुंबई नं. १४

# प्रज्ञा प्रकाशनातर्फे विक्रीस तयार

१. **लोकसाहित्याचा नवा दृष्टिकोन** ले. जनार्दन वाघमारे. कि. ४० पै

२. **अमृत वाक खंड काव्य** ले. कवि. चां. भ. खैरमोडे.कि.५० न पैसे

३. **डॉ. आंबेडकर पोवाडा** कवि जे. टी. कांबळे. कि. २५ न. पै.

४, **आंबेडकरी साहित्य** ले. आप्पा रणपिसे कि. १ रु.

**संप्रदयाचे समालोन भाग १ ला**

**भाग २ रा.** ,, लौवकरच प्रसिद्ध होणार

---

प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रभावी लेखणीतुन उतरलेले व श्री. चां. भ. खैरमोडे यांनी सुरस भाषांतर केलेले नवे पुस्तक "हिंदू खिरस्तांची उन्नती आणि अवनिति. याला जबाबदार कोण ?"कि.७५न.पैसे

---

आचार्य अत्रे यांच्या शैलीदार लेखणितून प्रकटलेले व भाऊसाहेब अडसुळ यांनीं संकलीत केलेले

## " दलितांचे बाबा "

किमत २ रुपये

---

दलित आणि बौद्धसमाजाच्या साहित्य चळवळीस वाहिलेले

अधिकृत द्वैमासिक " प्रज्ञा " वार्षिक वर्गणी ३ रु. संघ सभासदाकरितां वार्षिक वर्गणी २ रुपये. आजच मागणी करा.

कार्यवाह महाराष्ट्र दलित साहित्य संघ ६०।६५ बी. डी. डी. चाळ खोली मुंबई १८.